१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, सोमवार १ जून, २०२६ • वर्ष-१०४, अंक- ८८, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 88 Marathi - Daily - Mumbai, 1 June, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे

24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

मनोज जरांगे यांचे उपोषण मागे! नेमका काय तोडगा निघाला?

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

## थोडक्यात...

### कुलाब्यातील कनवल मॅन्शन इमारतीला आग

**मुंबई -** मुंबईतील कुलाबा परिसरात कनवल मॅन्शन या तीन मजली निवासी इमारतीच्या पहिल्या मजल्यावर आज दुपारी आग लागली होती. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी जलद आणि प्रभावी कार्यवाही करत काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळवले. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

### पुणे विषारी दारुकांडात मृतांचा आकडा २४ वर

**पुणे -** पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसराला हादरवून सोडणाऱ्या विषारी दारुकांडातील मृतांचा आकडा आता २४ वर पोहोचला. हडपसरमधील काळेपडळ परिसरात आणखी दोघांचा मृत्यू झाल्याने मृतांची संख्या वाढली आहे. या नव्या मृत्यूंमुळे हडपसरमधील बळींची संख्या ९ झाली, तर पिंपरी-चिंचवड परिसरात १५ जणांचा मृत्यू झाला. याप्रकरणी राज्य सरकारकडून मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची घोषणा राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी केली.

# बंगळुरूने सलग दुसऱ्यांदा आयपीएल स्पर्धा जिंकली



## विराटचे अर्धशतक! गुजरातवर एकतर्फी विजय

**रसिख सलाम (३), हॅझलवुड (२) आणि भुवनेश्वर कुमार (२) यांची प्रभावी गोलंदाजी आणि विराट कोहलीच्या नाबाद अर्धशतकाच्या बळावर आयपीएलच्या महाअंतिम सामन्यात गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने गुजरात टायटन्सवर ५ विकेटने एकतर्फी विजय मिळवून या स्पर्धेची सलग दुसऱ्यांदा ट्रॉफी जिंकली. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर आज झालेल्या या सामन्यात गुजरातने दिलेले १५५ धावांचे आव्हान बंगळुरुने ५ गडी गमावून १८ षटकांत सहज पूर्ण करून विजयोत्सव साजरा केला. या विजयात विराट कोहली ४२ चेंडूंत नाबाद ७५ धावा करून चमकला.**

■ अहमदाबाद

**बंगळुरुचे** कर्णधार रजत पाटीदारने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. मग जोश हॅझलवुडच्या तिसऱ्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर गुजरातचा सलामीवीर शुभमन गिल मोठा फटका मारण्याच्या नादात झेलबाद झाला. त्याने ८ चेंडूंत १० धावा केल्या. मग सलामीवीर साई सुदर्शनही १२ धावांवर खेळत असताना चुकीचा फटका मारून झेलबाद झाला. त्याला भुवनेश्वर कुमारने माघारी धाडले. त्यामुळे गुजरातची अवस्था ३.४ षटकांत २ बाद २६ धावा अशी झाली होती. त्यानंतरही बंगळुरुच्या गोलंदाजांनी आक्रमक मारा कायम ठेवल्यामुळे निशांत सिंधू आणि जोस बटलर या जोडीला चौकार आणि षटकार ठोकताच आले नाही. या दबावात गुजरातची धावगती अतिशय धिमी झाली. सिंधू हा रसिख सलामच्या आठव्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर षटकार लगावण्याच्या प्रयत्नात झेलबाद झाला. त्याने १८ चेंडूंत २० धावा केल्या.

वॉशिंग्टन सुंदरच्या साथीत बटलरला फारसे काही करता आले नाही. त्याला (१५) कृणाल पंड्याने बाद केले. मग ३ चेंडूंत १४ धावांवर खेळताना अर्शद खान पाचव्या विकेटच्या रुपात माघारी परतला. परिणामी गुजरातला १०० धावांचा टप्पा गाठण्यासाठी १४.२ षटकांपर्यंत वाट पाहावी लागली. त्यानंतर रसिख सलामने तेवतियाला ७ धावांवर झेलबाद करून गुजरातचे कंबरडे मोडले. भुवनेश्वरने आपल्या १९ व्या षटकांच्या तिसऱ्या चेंडूवर होल्डरला झेलबाद करून तंबूत धाडले. डाव्याच्या शेवटच्या षटकात रशीद खान एक षटकार ठोकून झेलबाद झाला. शेवटी वॉशिंग्टन सुंदर ३७ चेंडूंत ५० धावा आणि कागिसो रबाडा ३ चेंडूंत ३ धावा करून नाबाद राहिले. त्यामुळे गुजरातला निर्धारीत षटकात ८ बाद १५५ धावांपर्यंत मजल मारता आली. बंगळुरुकडून रसिख सलामने ३, जोश हॅझलवुड आणि भुवनेश्वर कुमारने प्रत्येकी २-२, कृणाल पंड्याने १ गडी बाद केला. या धावसंख्येचा पाठलाग करताना बंगळुरुचे सलामीवीर फलंदाज विराट कोहली आणि व्यंकटेश अय्यर सुरवातीपासून गुजरातच्या गोलंदाजांवर जोरदार हल्ला चढवला. » पान २ वर

## शेतकरी कर्जमाफी द्यायची तर ३० हजार कोटींचा भार?



**'लाडकी बहीण' योजनेसाठी दरमहा कोट्यवधी रुपयांचा खर्च होत असल्याने राज्याची आर्थिक स्थिती डळमळीत झाली असताना राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारकडून शेतकरी कर्जमाफीचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. सरकार लवकरच ही 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' लवकरच जाहीर करणार आहे. या योजनेचा लाभ सुमारे ३५ ते ४० लाख शेतकऱ्यांना मिळण्याचा अंदाज असून, कर्जमाफीची एकूण रक्कम २७,००० कोटी ते ३०,००० कोटी रुपये असू शकते. त्यामुळे आर्थिक पातळीवर सरकारला मोठी कसरत करावी लागणार आहे.**

■ मुंबई

**यंदाचा** अर्थसंकल्प सादर करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकबाकी असलेले पात्र शेतकरी २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीसाठी पात्र ठरणार आहेत. तसेच, वेळेवर कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना ५०,००० रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे. ही योजना ३० जूनपूर्वी जाहीर केली जाईल, असे आश्वासन सरकारने दिले आहे. परंतु विधान परिषदेच्या निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे घोषणेला विलंब होण्याची शक्यता व्यक्त होत होती. मात्र, ही योजना आधीच जाहीर झाल्याने आचारसंहितेचा अडथळा येणार नाही, असे सरकारकडून स्पष्ट करण्यात आले आहे. आवश्यक असल्यास निवडणूक आयोगाची परवानगी घेण्याची तयारीही दर्शवण्यात आली आहे.

दरम्यान, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे आज अहिल्यानगर येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंती दिनाच्या कार्यक्रमात बोलताना म्हणाले की, येत्या ८ ते १० दिवसांत सरकार कर्जमाफीची घोषणा करणार आहे.

## जरांगे उपोषणाला बसताच मंत्री भेटायला धावले

### मध्यरात्री समझोता! मंगळवारपर्यंत मुदत! पुन्हा आंदोलनाची धमकी

■ अंतरवाली सराटी

**मराठा** आरक्षण आंदोलक नेते जरांगे-पाटील यांनी त्यांच्या नेहमीच्या स्टाईलने आपल्या मागण्यांसाठी पुन्हा आंदोलनाचे हत्यार उपसले आणि गेल्या प्रत्येक आंदोलनात जे दृश्य दिसले ते यावेळीही बघायला मिळाले. जरांगे-पाटील आंदोलनाचा इशारा देत नाहीत तोपर्यंत सरकार कोणतीच पाऊले उचलत नाहीत आणि तोपर्यंत जरांगे-पाटील यांच्याशी पाच मिनिटांची चर्चा करीत नाहीत. मात्र ३० मे रोजी जरांगे-पाटील यांनी रणरणत्या उन्हात आंदोलन सुरू केले आणि दरवेळीप्रमाणे सरकारचे मंत्री आणि नेते यांनी अंतरवाली सराटीला धाव घेतली. जरांगे-पाटील आपल्या पद्धतीने दिवसभर मंत्र्यांना सुनावत राहिले, आपल्या मागण्यांचा पाढा वाचत राहिले. भाजपा आमदार प्रसाद लाड आणि नंतर मंत्री विखे-पाटील यांनी संयम पाळत त्यांच्याशी चर्चा केली, परत गेले, पुन्हा आले आणि अखेर मध्यरात्री दीड वाजता जरांगे-पाटील यांनी



सरकारने दिलेला मसुदा मान्य करत अखेर उपोषण स्थगित केले. मंगळवार २ जूनपर्यंत मसुद्यानुसार कारवाई झाली नाही तर पुन्हा आमरण आंदोलन सुरू करीन, अशी धमकीही त्यांनी यावेळी दिली.

जरांगे-पाटील यांच्या उपोषण » पान ७ वर

## शरद पवार बीसीसीआयचे कसे बनले?

### ललित मोदींनी सर्व हकीगत सांगितली

■ मुंबई

२००५ मध्ये झालेल्या बीसीसीआय अध्यक्षपदाच्या निवडणुकीत शरद पवार यांना विजयी करण्यासाठी पडद्यामागे मोठे राजकीय डावपेच खेळले गेले होते, असा गौप्यस्फोट आयपीएलचे माजी कमिशनर ललित मोदी यांनी केला. मतदारांना हॉटेलच्या खोल्यांमध्ये ठेवणे, काही प्रतिनिधींची विमाने वळवणे आणि निवडणुकीवर प्रभाव टाकण्यासाठी विविध रणनीती आखल्याचा खुलासा त्यांनी एका मुलाखतीत केला. या नाट्यमय घडामोडींमुळेच शरद पवार यांचा बीसीसीआय अध्यक्षपदाचा मार्ग मोकळा झाल्याचा दावा मोदी यांनी केला.

ललित मोदी म्हणाले की, आम्ही शरद पवारांना बीसीसीआय अध्यक्षपदाची निवडणूक लढवण्यास तयार केले. आम्ही आत्मविश्वासाने निवडणुकीला सामोरे गेलो, पण एका मताने आमचा पराभव झाला. कारण तिथे आमच्याच माणसांमध्ये अंतर्गत वाद होते. पुणे क्रिकेट असोसिएशनमध्ये अजित शिर्के आणि ज्ञानेश्वर आगाशे यांच्यात मतभेद झाले. दालमिया गटाने आगाशे यांना आपल्या बाजूने वळवले आणि आमचा एका मताने पराभव झाला. शेवटच्या क्षणी झालेल्या गुप्त मतदानात आगाशे यांनी बाजू बदलली. यामुळे पवार खूप नाराज झाले.पुढच्या वर्षी आम्ही पुन्हा पूर्ण ताकदीने लढलो. राजीव शुक्ला, एन. श्रीनिवासन हे सर्व दुसऱ्या » पान ७ वर

## मुस्लीम समाजाच्या १२ मागण्यांवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांची बैठक

■ मुंबई

**राज्याच्या** अल्पसंख्याक विकास विभागातील ४०६ पदे अनेक वर्षांपासून रिक्त असल्याने विविध कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीवर परिणाम होत आहे. त्यामुळे ही पदे तातडीने भरावीत, महाराष्ट्र अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (मार्टी) कामकाजाला गती द्यावी, भिवंडीतील उर्दू घराचा प्रस्ताव मार्गी लावावा, यासह १२ महत्त्वाच्या मागण्या समाजवादी पक्षाचे भिवंडी पूर्वचे आमदार रईस शेख यांनी उपमुख्यमंत्री तथा अल्पसंख्याक विकास मंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे केल्या आहेत. त्यानंतर अल्पसंख्याक विकास विभागाचा पदभार स्वीकारल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी प्रथमच मुस्लीम आमदारांची बैठक बोलावली असून, लक्षवेधी सूचनेच्या कार्यवाहीबाबत उद्या ही बैठक होणार आहे.

याबाबत आमदार रईस शेख म्हणाले की, विभागातील ४०६ पदांसह अल्पसंख्याक आयुक्तालयातील ३६ आणि जिल्हा कार्यालयांतील ८५ नव्याने मंजूर पदेही अद्याप भरलेली नाहीत. अल्पसंख्याक संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेचे कामकाज अद्याप सुरळीत झालेले नाही. भिवंडीतील उर्दू घराचा प्रस्ताव सादर केला आहे, मात्र काम प्रत्यक्ष सुरु नाही. तसेच लोकराज्य मासिकाची उर्दू आवृत्ती तातडीने सुरू करण्याची गरज आहे.

## ज्येष्ठ पार्श्वगायिका हरपली

### सुमन कल्याणपूर यांचे निधन

■ मुंबई

आपल्या मधाळ आणि दैवी सुरांनी गेली अनेक दशके श्रोत्यांच्या मनावर राज्य करणाऱ्या ज्येष्ठ पार्श्वगायिका सुमन कल्याणपूर यांचे आज निधन झाले. त्यांनी मुंबईतील राहत्या घरी वयाच्या ८९ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. मराठी, हिंदी, बंगाली, उडिया, पंजाबी, राजस्थानीसह अनेक भाषांमध्ये अजरामर गाणी गायली. २०२३ मध्ये त्यांना 'पद्मभूषण' पुरस्काराने गौरवण्यात आले होते.

२८ जानेवारी १९३७ रोजी जन्मलेल्या कल्याणपूर यांचा आवाजचे गानकोकिळा लता मंगेशकर यांच्या आवाजाशी कमालीचे साधर्म्य असूनही, त्यांनी स्वतःच्या गायकीचा एक वेगळा आणि खणखणीत ठसा उमटवला होता. त्यांनी संगीताचा अतिशय कसून आणि सखोल अभ्यास केला होता. त्यांचे माहेरचे नाव 'सुमन हेमाडी' असे होते. लग्नापूर्वी त्यांनी याच नावाने अनेक गाणी गायली. मराठी संगीतसृष्टीत त्यांचे पदार्पण महान कवी ग. दि. माडगुळकर



(गदिमा) यांच्या गीताने झाले. त्यानंतर त्यांनी कधीच मागे वळून पाहिले नाही. 'निंबोणीच्या झाडामागे', 'अरे संसार संसार', 'केतकीच्या बनी तिथे नाचला मोर' आणि 'रिमझिम झरती श्रावणधारा' यांसारखी एकापेक्षा एक अजरामर भावगीते आणि भक्तीगीते त्यांनी गायिली. आजही महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात ही गाणी आवर्जुन ऐकली जातात.

## तृणमूलच्या अभिषेक बॅनर्जींनंतर खासदार कल्याण बॅनर्जींवर हल्ला

■ कोलकाता

**पश्चिम** बंगालमध्ये निवडणुकीनंतर सुरू असलेल्या राजकीय हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर तृणमूलच्या नेत्यांवर हल्ल्यांच्या घटना वाढत असल्याचे दिसत आहे. माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे पुतणे आणि तृणमूलचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्यावर सोनारपूर येथे काल हल्ला झाला होता. त्यानंतर आज पक्षाचे खासदार कल्याण बॅनर्जी यांच्यावर हुगळी येथे हल्ला झाला.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

कल्याण बॅनर्जी हे अभिषेक यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेध करण्यासाठी समर्थकांसह आंदोलन करत होते. यावेळी ते पायी चालत असताना अचानक मागून फेकण्यात आलेला दगड त्यांच्या डोक्याला लागला. त्यांनी डोके पकडले आणि ते थेट रस्त्यावर कोसळले. हल्ल्यानंतर घटनास्थळी गोंधळ उडाला. या हल्ल्यावरून कल्याण यांनी भाजपावर सूडबुद्धीने हल्ला केल्याचा आरोप केला. ते म्हणाले की, हा कोणताही जनआक्रोश नव्हता. भगवी वस्त्रे घातलेल्या २० भाजपा कार्यकर्त्यांनी माझ्यावर हल्ला केला. त्यांनी मला शिवीगाळ केली आणि माझ्या डोक्यावर दगड मारला, ज्यामुळे प्रचंड रक्तस्त्राव झाला. हल्ला झाला तेव्हा बंगाल पोलीस मूकप्रेक्षक बनून उभे होते.

## चाचणीला सतत विरोध करणारी विनेश फोगाट चाचणीत पराभूत

**सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर स्पर्धात्मक कुस्तीच्या रिंगणात पुनरागमन झालेल्या विनेश फोगाट हिचे आव्हान चाचणी पातळीवरच नाट्यमयरित्या संपुष्टात आले. मिनाक्षी गोयत हिने तिचा ६-४ असा पराभव केला.**



■ नवी दिल्ली

**या** पराभवामुळे विनेशला यावर्षी जपानच्या आईची-नागोया येथे होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेपासून वंचित राहावे लागणार आहे. विनेश फोगाट आणि काही ज्येष्ठ कुस्तीपटू हे आंतरराष्ट्रीय सामन्यांसाठी पात्र ठरण्याकरिता आयोजित चाचणी सामने खेळण्यास तयार नव्हते. यावरून त्यांचा कुस्ती महासंघाचे प्रमुख बृजभूषण यांच्याशी मोठा वाद झाला आणि त्यांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले. त्यावेळी बृजभूषण यांचे म्हणणे होते की, ज्येष्ठ खेळाडूंनी दरवेळी विना चाचणी स्पर्धेत जाणे योग्य नाही. आता नवनवीन खेळाडू येत आहेत. त्यांना संधी दिली जावी. मात्र बृजभूषण यांच्यावर लैंगिक अत्याचारपासून अनेक आरोप झाले. आता चाचणी फेरीत फोगाट पराभूत झाली आहे. सर्वोच्च न्यायालय आणि कुस्ती फेडेरेशन ऑफ इंडियाच्या हस्तक्षेपानंतर विनेशला स्पर्धात्मक कुस्ती स्पर्धेत भाग घेण्याची परवानगी देण्यात आली होती.

## मुंबई-ठाण्यासह नवी मुंबईत पाऊस

### उकाड्याने त्रस्त नागरिकांना दिलासा

■ मुंबई

**मुंबई** शहर, उपनगरे, ठाणे, वसई-विरार आणि नवी मुंबई परिसरात आज सकाळी मान्सूनपूर्व सरींनी हजेरी लावली. अनेक भागांत हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाल्याने काही दिवसांपासून उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला.

मुंबईतील बोरिवली, अंधेरी, जोगेश्वरी, गोरेगाव, मालाड, विलेपार्ले, सांताक्रूझ तसेच दादर परिसरातील काही भागांत पावसाच्या सरी कोसळल्या. पूर्व उपनगरातील घाटकोपर, विक्रोळी, चेंबूर आणि कुर्ला परिसरातही चांगला पाऊस झाला. ठाणे, कल्याण, नवी मुंबई आणि पालघर परिसरातही पावसाने हजेरी लावली. काही भागांत अल्पकाळ पाऊस झाला, तर त्यानंतर दिवसभर ढगाळ वातावरण राहिल्याने हवेत गारवा निर्माण झाला. सकाळी ६ ते साडेसात वाजण्याच्या दरम्यान पावसाला सुरुवात झाली. काही ठिकाणी १० ते १५ मिनिटे, तर काही भागांत अर्धा तास पाऊस कोसळला.

## अभिनेत्री जॅकलीन फर्नांडिसवर मनी लाँड्रिंगचा आरोप निश्चित

■ नवी दिल्ली

२०० कोटी रुपयांच्या खंडणीशी संबंधित मनी लाँड्रिंगच्या खटल्यात बॉलिवूड अभिनेत्री जॅकलीन फर्नांडिससह मुख्य सुत्रधार सुकेश चंद्रशेखर, त्याची पत्नी लिना मारिया पॉल आणि अन्य आरोपींवर आरोप निश्चित करण्याचे आदेश दिल्ली न्यायालयाने दिले आहेत. सुकेश चंद्रशेखर, लिना पॉल आणि अन्य आरोपींविरुद्ध मकोका कायद्याखाली खंडणीचा आरोपही ठेवण्यात आला आहे. मात्र जॅकलीन खंडणीच्या गुन्ह्यामध्ये आरोपी नाही.



रॅनबॅक्सी कंपनीचे मालक शिविंदर सिंग यांच्या पत्नी अदिती सिंग यांच्या तक्रारीवरून दिल्ली पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर अंमलबजावणी संचलनालयाने (ईडी) या प्रकरणाची दखल घेत मनी लाँड्रिंगचा गुन्हा दाखल केला. ईडीने पुरवणी आरोपपत्रात आपल्याविरूद्ध दाखल केलेला गुन्हा रद्द करावा, अशी जॅकलिनने केलेली मागणी याआधी न्यायालयाने फेटाळली. चंद्रशेखर हा न्यायालयीन कोठडीत आहे. तर पत्नी लिनाला मनी लाँड्रिंगच्या खटल्यात न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. मात्र मकोकाअंतर्गत दाखल खटल्यात तिचा जामीन नामंजूर केला.

चंद्रशेखर हा एक कुख्यात गुन्हेगार आहे. त्याने अदिती सिंग यांच्याकडून सरकारी अधिकारी असल्याचे भासवून २०० कोटी रुपये उकळले, असे हे प्रकरण आहे.

नवाकाळ
Email- contact@navakal.in www.navakal.in /navakalofficial


# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

मालाड वेस्ट येथे इमिटेशन ज्वेलरी कामासाठी मुली/ महिला पाहिजेत. **9987577655** {NC260667}

इमिटेशन ज्वेलरीसाठी त्वरित अनुभवी मुली पाहिजेत. दहिसर ईस्ट, संपर्क **7021374861** {NC260715}

कोमोरी फोर कलर प्रिंटर, फिडरमॅन, बॉयलर, पेपर, प्रिंटिंग अनुभव असलेले सुपरवायझर पाहिजेत, लॅमिनेशन मशीन ऑपरेटर पाहिजेत. डोंबिवली स्टेशनपासून पिकअप ड्रॉपची सुविधा श्री साई ग्राफिक्स मानकोली नाका भिवंडी. मो.नं. **9167736969** {NC260676}

बोरीवली इस्टमध्ये इमीटेशनचा कामासाठी अनुभवी मुली/महिला पाहिजेत. (दिवसाचे 400/-) संपर्क: **9967083040** {NC260697}

अंबरनाथ प्रिंटिंग प्रेसमध्ये मशीन हेल्परसाठी मुले आणि पॅकींग कामासाठी मुलगी पाहिजेत. संपर्क: **9819853443** {NC260736}

सिक्युरिटी गार्ड हाऊसकीपिंग- लेडीज, जेन्स, -कॉटनग्रीन, चर्चगेट, दहिसर, मिरारोड, गोरेगाव. **8097507698** {NC260740}

समता विद्या मंदिर, मोहिली व्हिलेज, परेरावाडी, साकीनाका, मुंबई ७२ या शाळेत कामासाठी महिला व पुरुष शिपाई, वॉचमन, इलेक्ट्रीशियन पाहिजेत. दि. १२ जून रोजी सकाळी ११.०० ते ४.०० या वेळेत प्रत्यक्ष मुलाखतीसाठी हजर राहावे. संपर्क क्र. **9820131017/ 9819493390/ 8108781702** {NC260701}

हाऊसकीपिंग बॉईज, पगार रु. १५००० ते रु. १६०००, येण्या जाण्याचा रेल्वे पास मिळेल. ट्युलीप्स हाऊसकीपिंग संपर्क- आशिष- **7506802071** {NC260720}

## पाहिजेत

महानगर गॅस विक्रीची नोकरी. पगार रु. २५००० पर्यंत संपर्क **7021727174** क्षेत्र गोरेगाव ते वांद्रे {NC260752}

धुळे आणि शिरपूर येथे नामांकित शाळा आणि कॉलेजमध्ये त्वरित हाऊसकिपिंग मॅनेजर, हाऊसकिपिंग सुपरवायझर त्वरित पाहिजेत. (वयोमर्यादा- ४५ वर्षापर्यंत) पत्ता:- ४१४, ई - विंग, ४था माळा, झी-कार्पोरेट पार्क, opp. सनसिटी सिनेमा, एम. जी. रोड, विलेपार्ले (पूर्व) satguruenterprise1@gmail.com, **9326007480, 9820426010** {NC260748}

मुंबई सेंट्रल येथील नामांकीत सोसायटीसाठी सिक्युरिटी सुपरवायझर- पगार ₹22,000/- सिक्युरिटी गार्ड- पगार ₹20,000/- ड्युटी: 8 तास, साप्ताहिक सुट्टी, PF व ESIC सुविधा संपर्क: **8591979285/ 8591979289.** पत्ता: G9, सिक्युरिटी फोर्स त्रिवणी सदन, 1st, करीरोड (पूर्व), मुंबई- 400012. {NC260749}

कल्याण (कोणगाव) येथील प्रिंटिंग प्रेसमध्ये आवश्यकता आहेत:स्क्रीन प्रिंटिंग ऑपरेटर, लॅमिनेशन माचीच्या ऑपरेटर, ऑफसेट माचीच्या ऑपरेटर (SM-74), हेल्पर, फ्रेशर आणि पॅकिंग स्टाफ. संपर्क: **8652636907/ 9821434502** {NC260750}

इंटरनॅशनल शाळेमध्ये मीरारोडयेथे सफाई कर्मचारी बाई/ पुरुष पाहिजेत- **8169862708/ 9004949778** {NC260751}

ब्युरोमध्ये वेस्टर्न लाईनकरिता अनुभवी आया, वॉर्डबॉय दिवस पाळीकरिता १२ तासांसाठी पाहिजे. पगार 21,000/- **9920463209** {NC260753}

विक्रोळी येथील रबर फॅक्टरीमध्ये बॉयलर, टुनर, फिटर, इलेक्ट्रीशियन, हेल्पर्स पाहिजेत. **9619488763 / 7977248646.** {NC260754}

## पाहिजेत

एअरपोर्ट जॉब ओपनिंग्स पदे: लोडर, हाऊसकीपिंग (HK), बारटेंडर, शेफ, ग्राउंड स्टाफ, PSA, CSA, प्रमोटर इत्यादी. पगार: ₹20,000 ते ₹65,000 प्रतिमहिना सुविधा: लंच, PF, ESIC, प्रवास भत्ता (Traveling Allowance) संपर्क: तनिषा - **8591912932 / 8097351102** अधिक माहितीसाठी व अर्ज करण्यासाठी वरील क्रमांकावर संपर्क साधा. {NC260758}

प्रिन्टींगप्रेस मध्ये फिडरमॅन / पचिंग ऑपरेटर पाहिजे - **9820080776** {NC260755}

Office Assistance पाहिजे (भायखळा) - **9819551478** {NC260756}

थेट एअरपोर्ट, बँक व MNC कंपनीमध्ये नोकरीची संधी पदे: लोडर, ग्राऊंड/ काऊंटर स्टाफ, एअर होस्टेस, ड्रायव्हर, सुपरवायझर, मनी एक्सचेंज, DFS, प्रमोटर. पगार: ₹18,000- ₹45,000 सुविधा: जेवण, PF, ESIC, प्रवासभत्ता, संपर्क: अदनान- **9137153441/ 9137798268** {NC260757}

P Square Pest Control मध्ये मुले/मुली पाहिजेत. दादर **9820548338/** कांजुरमार्ग **9920548406** {NC260760}

पाहिजेत:- टेलिकॉम इंजिनियर, इलेक्ट्रिशियन, फिटर, वेल्डर, बार बाइंडर, सिव्हिल हेल्पर, कॉन्ट्रॅक्टर. ई-मेल: pathakenterprises@gmail.com - **7718042290 / 9323157573** {NC260737}

## Situation Vacant

URGENTLY REQUIRED
SECURITY MANAGER
LOCATION: MALAD – MUMBAI
Preferably Ex-Serviceman
Basic Computer Knowledge Required
Experience in Security / Manpower Industry is Must
CTC Upto Rs. 5,00,000/- Per Annum
CONTACT IMMEDIATELY
M/s Bakshi Security & Personnel Services Pvt. Ltd.
Office at Unit No. 234/235, Building No. 2, New Sonal Link Indl. Estate, Link Road, Malad (West), Mumbai – 400064
Mob.: 022-40272125 / 129 / 133 / 136
Mail: bakshi2001security@hotmail.com

Required male production supervisor for packaging co at Chakan. Contact: **8080000700** {NC260705}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: **9820627580 / 9820904646** {NC260552}

## व्यसन मुक्ती

दारू सोडवा : दारू, तंबाखू, गुटखा, सिगारेट, औषधे उपलब्ध. डॉ., नागरगोजे- **9765609769** {NC260716}


## वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतः च्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.
- **मॅनेजर, 'नवाकाळ'**

# आजचे राशी भविष्य

सोमवार ता. १ जून २०२६
ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू

| | |
|---|---|
| मेष | कार्यक्षेत्रात नवीन संधी उपलब्ध होतील मात्र काही अडचणींचा सामना करावा लागेल. अचानक धनलाभाचे योग. |
| वृषभ | तुमच्या बोलण्याचा प्रभाव पडेल. कामे मार्गी लागतील. आर्थिक स्थिती चांगली राहील. |
| मिथुन | आर्थिक लाभाचे प्रमाण चांगले राहील. नवीन ओळखीचा फायदा होईल. नोकरीतून लाभ मिळतील. |
| कर्क | कामानिमित्त दूरचा प्रवास घडेल. वास्तुसंबंधित कामे लांबणीवर पडतील. |
| सिंह | कौटुंबिक नात्यात तणाव येऊ देऊ नका. सहकाऱ्यांशी पटवून घ्यावे लागेल. |
| कन्या | विविध मार्गाने आर्थिक लाभ होईल. प्रवासात सतर्कता बाळगावी. जोडीदाराशी मतभेद टाळा. |
| तूळ | आर्थिक व्यवहार जपून करावेत. नोकरीत नवीन जबाबदारी स्वीकारावी लागेल. व्यवसायामध्ये वाढ होईल. |
| वृश्चिक | कार्यक्षेत्रात नवीन संकल्पना राबवाल. विरोधकांवर मात करण्यात यश मिळेल. जोडीदाराबरोबर आनंदाने वेळ व्यतीत होईल. |
| धनु | व्यवसायामध्ये आर्थिक स्थित्यंतरे जाणवतील.एखादी चिंता निर्माण होईल. आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात. |
| मकर | वास्तुसंबंधित कामांमध्ये सफलता मिळेल. नोकरीनिमित्त प्रवास घडेल. भागीदारी व्यवसायात लाभ होतील. |
| कुंभ | कामानिमित्त दूरच्या प्रवासाचे योग येतील. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखण्यात यश मिळेल. संततीसौख्य लाभेल. |
| मीन | नोकरीमध्ये काही बदल होण्याची शक्यता राहील. घरामध्ये खेळीमेळीचे वातावरण राहील. संततीबाबत शुभवार्ता समजतील. |

# शुभ राशी ता. ०१/६/२०२६

| | | |
|---|---|---|
| ७ | ३ | ८ |
| ७१ | ३० | ८२ |
| ७६ | ३५ | ८७ |
| १२४ | १३९ | १८९ |
| ३४० | २३८ | ३७८ |

देश विदेश

# हिमाचल सरकार कर्मचाऱ्यांची नियुक्तीपूर्वी ड्रग चाचणी

■ शिमला

**हिमाचल** प्रदेश सरकारने अमली पदार्थविरोधी मोहीम अधिक कडक केली असून, यापुढे राज्य सरकारच्या सेवेत नियुक्तीपूर्वी सर्व उमेदवारांची अमली पदार्थ चाचणी करण्याचा निर्णय घेतला आहे.

हेरॉईनच्या तस्करीमध्ये सामिल असलेल्या सरकारी कर्मचाऱ्यांवर काय कारवाई केली, याचा अहवालही मुख्यमंत्री सुखविंदर सुख्खू यांनी मागवला आहे. या अहवालाच्या आधारे सर्व संबंधितांवर कठोरात कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा मुख्यमंत्री सुख्खू यांनी दिला आहे.

हिमाचल प्रदेशमध्ये हेरॉईनचा प्रसार ही सरकारसमोर मोठी डोकेदुखी ठरली आहे. स्थानिक भाषेत याला चिट्टा असे म्हणतात. पंजाब, चंदीगढ आणि अन्य शेजारी राज्यांमध्ये तस्करीच्या मार्गाने चिट्टा हिमाचल प्रदेशमध्ये आणले जाते. विशेषतः युवक आणि विद्यार्थ्यांमध्ये याचा प्रसार झपाट्याने होत आहे. राज्य सरकार यासाठी चिट्टा मुक्त हिमाचल, अशी मोहीम राबवली आहे.

# नंदनवन प्राणीसंग्रहालय व जंगल सफारी महाग होणार

■ रायपूर



**नवा** रायपूर येथील नंदनवन प्राणीसंग्रहालय आणि जंगल सफारीसाठी पर्यटकांना लवकरच अधिक पैसे मोजावे लागणार आहेत. वन विभागाने प्रवेश शुल्क, सफारी राईड, जिप्सी बुकिंग आणि फोटोग्राफी यांसारख्या विविध सुविधांसाठी नवीन दरांचा प्रस्ताव दिला आहे.

नव्या प्रस्तावात ६ ते १२ वर्षे वयोगटातील मुलांसाठी प्रवेश शुल्क २५ रुपयांवरून ५० रुपये करण्यात आले आहे, तर १२ वर्षांवरील पर्यटकांना आता १०० रुपये द्यावे लागतील. यापूर्वी हा दर ५० रुपये होता. परदेशी पर्यटकांसाठी प्रवेश शुल्क २०० रुपयांवरून ५०० रुपये करण्याचा प्रस्ताव आहे. तथापि, दिव्यांग व्यक्ती आणि ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्रांच्या आधारे मोफत प्रवेश मिळत राहील. ही सवलत शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी लागू होणार नाही. सामान्य बस, एसी बस आणि ईलेक्ट्रिक बस सफारीच्या तिकिटांमध्येही वाढ करण्यात आली आहे. मुलांसाठी शुल्क अनुक्रमे १०० रुपये, १५० रुपये आणि १७५ रुपये निश्चित करण्यात आले आहे. तर प्रौढ पर्यटकांना सामान्य बससाठी १५० रुपये, एसी बससाठी २०० रुपये आणि ईलेक्ट्रिक बससाठी २५० रुपये द्यावे लागतील. परदेशी पर्यटकांसाठी सफारी शुल्क ७५० रुपयांवरून १२५० रुपये निश्चित करण्यात आले आहे.

# मला बंगल्यातून बाहेर काढून दाखवा राबडी देवींचे सरकारला आव्हान

■ पाटणा



**बिहारमध्ये** मुख्यमंत्री सम्राट चौधरी सरकार आणि राजदचे सर्वेसर्वा लालुप्रसाद यादव कुटुंब आमनेसामने उभे ठाकले आहेत. बळाचा वापर करून मला बंगल्यातून बाहेर काढून दाखवा, असे आव्हान माजी मुख्यमंत्री राबडी देवी यांनी चौधरी सरकारला दिले आहे. राबडी देवी १०, सर्क्युलर रोड या शासकीय निवासस्थानी गेली वीस वर्षे वास्तव्यास आहेत. लालुप्रसाद आणि मुलगा तेजस्वी यादव यांच्यासोबत त्या या बंगल्यात राहत आहेत. बिहारच्या इमारती आणि बांधकाम विभागाने काल राबडी देवी यांना बंगला रिकामा करण्यासाठी तिसरी आणि निर्वाणीची नोटीस बजावली.

# पाकिस्तानातून परतणाऱ्या अफगाण निर्वासितांचा ट्रक उलटला! १८ ठार

■ काबूल

**पाकिस्तानमधून** मायदेशी परतणाऱ्या अफगाण निर्वासितांना घेऊन जाणारा ट्रक पूर्व अफगाणिस्तानात उलटल्याने अपघात झाला. लघमान प्रांतातील मुख्य महामार्गावर झालेल्या या अपघातात किमान १८ जणांचा मृत्यू झाला, तर ३५ जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये १० लहान मुले आणि पाच महिलांचा समावेश असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

प्रांतीय गव्हर्नरचे प्रवक्ते अब्दुल मलिक नियाझाई यांनी सांगितले की, हा अपघात काबूल आणि नंगरहार प्रांताला जोडणाऱ्या प्रमुख महामार्गावर झाला. अपघातानंतर स्थानिक प्रशासन आणि बचाव पथकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमींना उपचारासाठी नंगरहारमधील विविध रुग्णालयांमध्ये दाखल केले.



या दुर्घटनेबद्दल तालिबान सरकारचे प्रवक्ते झबिहुल्ला मुजाहिद यांनी दुःख व्यक्त करत जखमींना आवश्यक वैद्यकीय मदत देण्याचे निर्देशही प्रशासनाला दिले आहेत. अफगाणिस्तानात रस्त्यांची दुरवस्था, वाहनांची खराब स्थिती आणि वाहतूक नियमांकडे होणारे दुर्लक्ष यामुळे अशा अपघातांच्या घटना वारंवार होतात. या दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेले आणि जखमी झालेले अनेकजण पाकिस्तानमधून परतत असलेल्या निर्वासितांपैकी होते.

पाकिस्तानने २०२३ पासून अवैध स्थलांतरितांविरोधात मोहीम सुरू केली असून, त्यानंतर हजारो अफगाण नागरिकांना देश सोडावा लागला आहे. अनेकांना हद्दपार करण्यात आले, तर अनेकांनी दबावामुळे मायदेशी परतण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, इराणनेही अफगाण स्थलांतरितांविरोधात कारवाई तीव्र केल्याने लाखो अफगाण नागरिक परतत आहेत.

# जपानी कंपनीचा अनोखा निर्णय सिगारेट न ओढणाऱ्यांना ६ रजा

■ टोकियो

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

**कर्मचाऱ्यांचे** आरोग्य सुधारावे आणि कामकाजात अधिक समतोल निर्माण व्हावा यासाठी जगभरातील अनेक कंपन्या वेगवेगळे प्रयोग करत असतात. अशातच जपानमधील एका कंपनीने घेतलेला अनोखा निर्णय सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. धूम्रपान न करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वर्षाला सहा अतिरिक्त सुट्ट्या देण्याचा निर्णय कंपनीने घेतला आहे.

हा उपक्रम जपानमधील पियाला या कंपनीने सुरू केला आहे. कंपनीतील काही कर्मचाऱ्यांनी व्यवस्थापनाकडे तक्रार केली होती की, धूम्रपान करणारे कर्मचारी दिवसातून अनेकदा सिगारेटसाठी ब्रेक घेतात. त्यामुळे त्यांच्या कामाचा ताण इतर कर्मचाऱ्यांवर पडतो. तर धूम्रपान न करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अशा विश्रांतीचा लाभ मिळत नाही. या तक्रारीनंतर कंपनीने कर्मचाऱ्यांमध्ये सर्वेक्षण केले. त्यानंतर कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) ताकाओ असुका यांनी धूम्रपान न करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वर्षाला सहा अतिरिक्त सुट्ट्या देण्याचा निर्णय जाहीर केला. कंपनीच्या मते, या धोरणामुळे कर्मचाऱ्यांमध्ये समानता निर्माण होईल.

# अमेरिका, ब्रिटन आणि ऑस्ट्रेलिया पाण्याखालील ड्रोन विकसित करणार

■ सिंगापूर

**अमेरिका,** ब्रिटन आणि ऑस्ट्रेलिया समुद्राखालील केबल्सचे संरक्षण करण्यासाठी आणि संरक्षण मजबूत करण्यासाठी पाण्याखालील ड्रोन तंत्रज्ञान विकसित करणार आहे. या प्रकल्पाचा एकूण खर्च जाहीर करण्यात आला नसला तरी ब्रिटनचे संरक्षण सचिव जॉन हीली यांनी सांगितले की, ब्रिटन १५० दशलक्ष पाऊंडचे (२०१ दशलक्ष डॉलर) योगदान देईल. सिंगापूरमध्ये झालेल्या सुरक्षा शिखर परिषदेत या देशांच्या संरक्षण मंत्र्यांनी ही घोषणा केली आहे. या देशांनी एका संयुक्त निवेदनात म्हटले की, नवीन प्रकल्पांतर्गत अत्याधुनिक पेलोड्स आणि सक्षम प्रणाली विकसित केल्या जातील, ज्या समुद्रतळावरील पायाभूत सुविधांचे संरक्षण करणे, हल्ले करणे, पाळत ठेवणे आणि टेहळणी करणे, लॉजिस्टिक्स ऑपरेशन्स पार पाडणे यासारखी कामे करू शकतील.

हीली यांनी ब्रिटनच्या उत्तरेकडील पाण्यातील केबल्स आणि पाईपलाईन्सवर रशिया एक गुप्त मोहीम चालवत असल्याचा आरोप केल्यानंतर एका महिन्याने ही घोषणा करण्यात आली. २०२१ मध्ये सुरू झालेल्या ऑकस संरक्षण करारानुसार हे तीन देश अणु-पाणबुड्या विकसित करत आहेत आणि लष्करी कौशल्याची देवाणघेवाण करत आहेत. डिसेंबरमध्ये ब्रिटन आणि नॉर्वेने समुद्राखालील केबल्सचे संरक्षण करण्यासाठी उत्तर अटलांटिकमध्ये रशियन पाणबुड्यांचा शोध घेण्याच्या करारावर स्वाक्षरी केली.

# शिंदे यांच्या हस्ते 'धनगररत्न' पुरस्कारांचे वितरण

■ ठाणे

**पुण्यश्लोक** अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त ठाण्यातील धनगर प्रतिष्ठान या संस्थेच्या वतीने आयोजित अहिल्यादेवी होळकर स्मारक उद्घाटन आणि धनगररत्न पुरस्कार सोहळ्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अहिल्यादेवींच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या आदर्शांवर राज्यकारभार चालवत असल्याचे सांगितले. स्मारक उभारणीसाठी योगदान देता आले, हे आपले भाग्य असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

यावेळी बोलताना शिंदे म्हणाले की, अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य जगप्रसिद्ध आहे. त्यांनी देशभरातील अनेक मंदिरे, घाट, धर्मशाळा आणि अन्नछत्रे उभारून समाजसेवेचा आदर्श निर्माण केला. त्यांच्या स्मारकासाठी छोटासा का होईना हातभार लावता आला, याचा मला अभिमान आहे.

स्मारक उभारणीसाठी पुढाकार घेतलेल्या संस्थेचे विशेष अभिनंदन करत त्यांनी सांगितले की, मर्यादित जागेतही अत्यंत सुंदर आणि प्रेरणादायी स्मारक उभे राहिले आहे. अहिल्यादेवींच्या कार्याला खरी श्रद्धांजली म्हणजे त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे होय, असेही ते म्हणाले.

# एसआरएमध्ये दोन हजार तक्रारी प्रलंबित रहिवाशी निर्णयाच्या प्रतीक्षेत

■ मुंबई

**वांद्र्याच्या** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण अर्थात एसआरए कार्यालयात सन २०१२ पासून अंदाजे दोन हजार विविध प्रश्नांच्या बाबत रहिवाशांच्या तक्रारी प्रलंबित आहेत. हे अर्जदार गेल्या अनेक वर्षांपासून निर्णयाच्या प्रतीक्षेत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. मुंबईसह उपनगरातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेशी संबंधित असलेल्या कलम ३३ व ३८ अंतर्गत पारित करण्यात आलेले आदेश, झोपड्यांची पात्रता-अपात्रता, थकीत भाडे पुनर्वसन सदनिकांच्या वाटपाबाबतची प्रकरणे, रखडलेले झोपू प्रकल्प, प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांनी पारित केलेल्या नोटीसा, निर्देश, आदेश, परवानगी या निर्णयाविरुद्ध दाखल करण्यात आलेले अपील अर्ज, अशा अनेक विषयांशी संबंधित अर्ज रहिवाशी एसआरए कार्यालयातील शिखर तक्रार निवारण समितीकडे दाखल करतात. मात्र या अर्जांवर होणारी सुनावणी म्हणजे एक महिन्याचे काम वर्षभर थांब.

# बंगळुरूने सलग दुसऱ्यांदा आयपीएल स्पर्धा जिंकली

पान १ वरून

त्यांनी २१ चेंडूंत ५० धावांचा टप्पा पार केला. मग व्यंकटेश १५ चेंडूंत २ षटकार आणि ४ चौकारांसह ३२ धावांवर खेळत असताना त्याला मोहम्मद सिराजने बाद केले. त्यापाठोपाठ देवदत्त पडिक्कलला फक्त १ धावेवर कागिसो रबाडाने माघारी धाडले. रजत पाटीदार रशीद खानच्या नवव्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर सीमारेषेवर झेलबाद झाला. त्याने १३ चेंडूंत १५ धावा केल्या. त्यानंतर या षटकाच्या पाचव्या चेंडूवर कृणाल पंड्या पायचित झाल्यामुळे बंगळुरुचा संघ काहीसा दबावात आला. मात्र दुसऱ्या बाजूला आक्रमक फलंदाजी करणाऱ्या विराट कोहलीने २५ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले.

टिम डेव्हिडने विराटला चांगली साथ दिली. मात्र तो १६ चेंडूंत २४ धावा करून अर्शद खानचा शिकार बनला. मात्र तोपर्यंत हा सामना बंगळुरुच्या बाजूने पूर्ण झुकला होता. शेवटी जितेश शर्माच्या साथीत विराटने षटकार ठोकून १८ षटकांत विजयी आकडा गाठला आणि आपल्या संघाचे आयपीएलच्या चषकावर नाव कोरले. विराटने ४२ चेंडूंत नाबाद ७५ आणि जितेश शर्माने १४ चेंडूंत नाबाद ११ धावा केल्या.

# वांद्र्यातील पादचारी पूल बंदच

■ मुंबई

**वांद्रे** गरीब नगर येथील शेकडो बेकायदा झोपड्या रेल्वे प्रशासनाने पाडल्या आहेत. कारवाई होऊन आठ दिवस उलटले तरीही पादचाऱ्यांना ये-जा करण्यासाठी असलेला पूर्व-पश्चिम जोडणारा रेल्वेचा पादचारी पूल बंद ठेवण्यात आला आहे. इतकेच नव्हे तर या रस्त्यावरील बेस्ट बसेसची वाहतूक बंद असल्याने प्रवाशांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. गरीब नगराला खेटून असलेला हा पादचारी पूल गेले अनेक वर्षांपासून उभा आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी पुलाच्या दुसऱ्या टप्प्यावर पूर्वच्या बाजूस उपनगरीय रेल्वे तिकीट घर आहे. येथे तिकीट काढणे प्रवाशांना सोयीचे ठरत होते. मात्र गरीब नगरातील झोपडपट्ट्यांवर तोडक कारवाई करताना पोलिसांनी येथील रस्ता व पादचारी पूल बंद केला होता.

# गोकुळ निवडणुसाठी महायुतीची छत्रपती शाहू शेतकरी विकास आघाडी

■ कोल्हापूर

**कोल्हापूर** जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात 'गोकुळ' दूध संघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. सहकार आणि राजकारणाच्या दृष्टीने अत्यंत प्रतिष्ठेची मानली जाणारी ही निवडणूक महायुतीने एकत्रितपणे लढण्याचा निर्णय घेतला असून 'छत्रपती शाहू शेतकरी विकास आघाडी'ची अधिकृत घोषणा केली.

कोल्हापूर येथील रेसिडेन्सी क्लबमध्ये उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत महायुतीच्या प्रमुख नेत्यांची बैठक पार पडली. या बैठकीत वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, पालकमंत्री प्रकाश आबिटकर, खासदार धनंजय महाडिक, आमदार डॉ. विनय कोरे, आमदार अमल महाडिक तसेच जनसुराज्य युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष समित कदम यांच्यासह महायुतीतील प्रमुख नेते उपस्थित होते. यानंतर आमदार डॉ. विनय कोरे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार ही बैठक आयोजित केली होती. निवडणुकीच्या तयारीसंदर्भात सर्व नेत्यांमध्ये सकारात्मक चर्चा झाली. गेल्या काही महिन्यांपासून महायुतीतील काही नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू असल्याने गोकुळ निवडणुकीत महायुती एकत्र राहणार का, याबाबत संभ्रम निर्माण झाला होता. मात्र, आजच्या बैठकीनंतर सर्व मतभेद दूर झाले असून, महायुती एकसंधपणे निवडणुकीला सामोरी जाणार आहे. याठिकाणी जागावाटपावरही प्राथमिक चर्चा झाली. अंतिम जागावाटपाचा फॉर्म्युला ठराव मागणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निश्चित केला जाणार असून त्याबाबत अंतिम निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घेतील.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# टाईमबॉम्ब ठरणारे दहशतीचे नवे मॉड्यूल

रोज बदलत असलेल्या परिस्थितीचा गैरफायदा घेणारे सक्रिय झालेले आहेत. अगदी दोनच दिवसांपूर्वी आम्ही याच स्तंभामधून 'अंतर्गत सुरक्षिततेला आव्हान ठरणारे टाईमबॉम्ब' या मथळ्याखाली मजकूर लिहीला होता. बाह्य सुरक्षेपेक्षाही अंतर्गत सुरक्षा पुन्हा एकदा तसा चिंतेचा विषय होत आहे, हे मांडण्याचा आम्ही प्रयत्न केला. विशेषतः देशाला अस्थिर करणारे घटक पुन्हा कार्यरत झालेले आहेत. दहशतवादी कृत्ये करणाऱ्यांना देशातल्या सहानुभूतीदारांची मोठी साथ मिळते आहे. विशेषतः दिल्लीतल्या कारबॉम्बस्फोटामध्ये पुन्हा एकदा देशामध्ये मोठे काहीतरी षड्यंत्र घडवून आणायचे अशा हालचाली सुरू झाल्या. राज्यातल्या वेगवेगळ्या भागात तिथल्या परिस्थितीचा अंदाज घेऊन आपले उद्दिष्ट साध्य करण्याची कारस्थाने सुरू झालेली आहेत. आणि ही कारस्थाने म्हणजेच केव्हाही, कुठेही फुटू शकणारे टाईमबॉम्ब आहेत असे आम्ही त्यात स्पष्टपणे म्हटले होते. हा मजकूर लिहिल्यानंतर पुढच्या काही दिवसांतच दिल्ली पोलिसांनी पाकिस्तानच्या आयएसआय पुरस्कृत एका मोठ्या दहशतवादी हल्ल्याचे मॉड्यूल उद्ध्वस्त केले. यासंबंधात नऊ जणांना अटक झाली. विशेष म्हणजे मुंबईतल्या गुन्हेगारी टोळ्यांमार्फत या कारस्थानाची अंमलबजावणी होणार होती. मुंबईतील दाऊद इब्राहिमचा साथीदार मुन्ना झिंगाडा हा त्यातला मुख्य सूत्रधार असल्याची माहिती समोर येते आहे. दिल्ली, मुंबईसकट राज्यातल्या मोठ्या शहरांमध्ये दहशतवादी हल्ले घडवण्याचा कट आखला गेला होता. दिल्ली पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्र, हँडग्रेनेड आणि बरीच स्फोटक सामुग्री जप्त केली. विशेषतः दिल्लीतील महत्त्वाची सरकारी कार्यालये तर मुंबईतल्या मंत्रालय परिसराबरोबरच अनेक धार्मिक स्थळं आणि सार्वजनिक गर्दीच्या ठिकाणी हल्ले घडवण्याचा कट होता. वेगवेगळ्या नावाने इन्स्टाग्राम अकाऊंट उघडून हे आठही जण एकमेकांच्या संपर्कात असायचे. त्यांना पाकिस्तानच्या आयएसआयकडून पैसा उपलब्ध होत होता. दिल्ली काहीशा शांत भागामध्ये एक फ्लॅट घेऊन तिथून या सगळ्या हल्ल्याचे सूत्रसंचालन केले जाणार होते. या सर्वांपर्यंत पैसे पोहोचवण्याचे काम एकेकाळी दाऊद इब्राहिमचा जवळचा हस्तक असलेल्या या गुंडाकडे सोपवण्यात आलेले होते.

**पुन्हा मुंबई दिल्ली टार्गेट**

ज्या पद्धतीने दहशत माजवून एकाचवेळी हाहाःकार निर्माण करण्याचा प्लॅन लक्षात घेतला तर मोठ्या प्रमाणावर जीवितहानी घडवण्याचाच मुख्य उद्देश दिसून येतो. कारण त्यांच्याकडे सापडलेल्या हँडग्रेनेडचा संदर्भ लक्षात घेतला तर २६ नोव्हेंबरला मुंबईत घडवलेल्या दहशतवादी हल्ल्याप्रमाणेच हाही हल्ला घडवण्याचा त्यांचा कट होता. दोन दिवसांपूर्वी पहाटे एक वाजता दिल्ली पोलिसांनी पंजाबला जाणारी एक कार अडवली ज्यामध्ये शस्त्र सापडली. त्यानंतर चौकशीची चक्रे फिरली आणि एकमेकांशी संपर्कात असलेल्या या नऊ जणांच्या टोळीचा शोध लागला. मुंबईत आतापर्यंत मोठे दहशतवादी हल्ले झाले ते दाऊद इब्राहिमच्या मदतीने घडवले गेल्याचे चौकशीत स्पष्ट झाले होते. मग अगदी १९९० च्या दशकातील बॉम्बस्फोट असो. २००८ चा २६ नोव्हेंबरचा दहशतवादी हल्ला असो किंवा २०११-१२ चे मुंबईतले बॉम्बस्फोट असोत. या सर्वांमागे स्थानिक गुंडटोळ्यांचा सहभाग होता. २६ नोव्हेंबरच्या हल्ल्यातील दहा दहशतवाद्यांना मुंबईत गेट वे वर सुखरूप पोहोचवण्यात दाऊद इब्राहिम टोळीचा हात असल्याचे निष्पन्न झाले होते. काहीशी तशीच मोडस ऑपरेंडी वापरून आताचे मॉड्यूल तयार केले गेले. खरे तर या प्रकाराची माहिती मुंबई पोलिसांनाही मिळणे आवश्यक होते. जर दिल्ली पोलिसांकडे ही सतर्क मोहीम पार पाडली गेली नसती, तर मुंबई पुन्हा एकदा दहशतवादी हल्ल्यांनी हादरली असती. या नव्या देशभर अस्थिरता माजवणाऱ्या कटाचे गांभीर्य लक्षात घेतले तर मुंबई पोलिसांनी खूप सतर्क राहण्याची आवश्यकता आहे. आता जरी या आठ जणांना अटक झाली असली तरीसुद्धा त्यांचेच काही हस्तक देशाच्या वेगवेगळ्या भागात काही ना काही कुरापती करण्याची शक्यता आहे. म्हणूनच देशभर विशेष अलर्ट दिला गेला आहे. अतिशय वेगळ्या पद्धतीने आणि आपले संवाद इंटरसेप्ट होणार नाहीत किंवा सुरक्षा यंत्रणांना त्याचा संशय येणार नाही याची पूर्ण दक्षता घेऊन या हल्ल्याची तयारी सुरू होती. अनेक ठिकाणची रेकी झाल्याचेही चौकशीत निष्पन्न झालेले आहे.

**देशातील छुपे शत्रू**

ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानची आयएसआय एजन्सी आणि तिथले दहशतवादी अड्डे पुन्हा भारतविरोधी कारस्थाने आखू लागली आहेत. त्यातही भारत सरकारने ऑपरेशन सिंदूर थांबवलेले नाही. पुण्यात राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या कार्यक्रमात बोलताना लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी संयुक्त कारवाई पुन्हा यशस्वी होऊ शकते असा दावा केला. त्यांनी भारताची तीनही दलं एकत्रित मोहीम यशस्वी करतात आणि आमची ऑपरेशन सिंदूर २ ची तयारी सुरू आहे, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. जिथून या हल्ल्यांची सूत्रं हलवली जात आहेत तिथे पुन्हा एकदा वज्राघात करण्याची वेळ येऊ शकते. असेच हवाई दल प्रमुखांच्या विधानातून स्पष्ट होते. याचा अर्थ देशांतर्गत सुरू असलेली ही दहशत निर्माण करणारी कारस्थाने म्हणजे पुन्हा छुप्या युद्धाचाच भाग ठरतो. त्यांना मदत करून आपले षड्यंत्र यशस्वी करण्याचा पाकपुरस्कृत डाव ठरतो. ऑपरेशन सिंदूर जरी झाले असले तरी देशाच्या अनेक भागांतले हे छुपे युद्ध घडवणारे हेच ते टाईमबॉम्ब आहेत, आणि ते सतत जागृत राहूनच नेस्तनाबूत करावे लागतील. टाईमबॉम्बचे हे नवे मॉड्यूल पूर्वीपेक्षा अधिक थरारक असण्याची शक्यता होती. कारण यात अतिमहत्त्वाच्या सरकारी इमारतींना टार्गेट करून अफरातफरी निर्माण करण्याचाही हेतू होता. त्यात देशातील अणूप्रकल्प, विमानतळ, रेल्वे स्थानके, ऊर्जा प्रकल्प, या ठिकाणांना टार्गेट केले जाणार होते. यात नऊ जणांना जरी अटक झाली असली तरी त्यांना सहाय्य करणाऱ्या देशांतील छुप्या शत्रूंना कठोरपणे शोधून काढायला हवे आणि कठोर शिक्षाही व्हायला हवी.

## सुविचार


**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

ज्यांच्याकडे ध्येय नसतं
तेच दुसऱ्यांच्या आयुष्यात जास्त ढवळाढवळ करतात.

## पंचांग

**सोमवार, १ जून २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**

*** अधिक ज्येष्ठ कृष्ण प्रतिपदा**
**नक्षत्र : ज्येष्ठा**



**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते १९-०८ वृश्चिक**
**१९-०९ ते २४-०० धनु**

**रवी उदय- ०६-०२**
**रवी अस्त- १९-११**

**गुरू कर्केला उत्तररात्री १.५३**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती




### आंब्याचा चीज केक



★ **साहित्य :** १५० ग्रॅम डायजेस्टिव्ह किंवा मारी बिस्किटे, ८० ग्रॅम वितळलेले बटर, **चीजच्या थरासाठी-** २०० ग्रॅम क्रीम चीज किंवा पनीर (घट्ट), १/२ कप कंडेन्स्ड मिल्क किंवा पिठीसाखर, १ कप आंब्याचा रस, १ छोटा चमचा व्हॅनिला इसेन्स, २ चमचे चायना ग्रास. **वरच्या थरासाठी** - १ कप आंब्याचा रस, १ छोटा चमचा चायना ग्रास, १-२ चमचे साखर.

★ **कृती : बेससाठी-** बेस तयार करण्यासाठी बिस्किटांना मिक्सरमध्ये बारीक वाटून पावडर बनवा. त्यात वितळलेले बटर मिक्स करा. हे मिश्रण केक टिनच्या तळाशी दाबून एकसारखे पसरवा आणि १० मिनिटे फ्रीजमध्ये ठेवा. चीज लेयरसाठी एका बाऊलमध्ये क्रीम चीज (किंवा मऊ पनीर), कंडेन्स्ड मिल्क आणि आंब्याचा रस एकत्र फेटून गुळगुळीत मिश्रण बनवा. गरम पाण्यात चायना ग्रास विरघळवून या मिश्रणात टाका. हे मिश्रण बिस्किट बेसवर ओतून अर्धा तास फ्रीजमध्ये सेट होऊ द्या. त्यानंतर एका पातेल्यात आंब्याचा रस, साखर आणि चायना ग्रास एकत्र करून २ मिनिटे उकळा. थोडे थंड झाल्यावर चीज लेयरवर तिसरा थर म्हणून ओता. आता हा केक टिन ३-४ तास किंवा रात्रभर फ्रीजमध्ये थंड होण्यासाठी ठेवा. त्यानंतर थंडगार आंब्याचा चीज केक कापून सर्व्ह करा!




# नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धा! गुकेशकडून प्रज्ञानंद पराभूत
## दिव्या देशमुख महिलांच्या गटात अव्वल स्थानी



**नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेच्या पाचव्या फेरीत विश्वविजेता डी. गुकेशने प्रज्ञानंदवर मात करत विजय मिळवला. महिलांच्या गटात दिव्या देशमुखने झू जिनरला पराभूत करून गुणतालिकेत आघाडी घेतली. मॅग्नस कार्लसेनलाही वेस्ली सो विरुद्ध पराभवाला सामोरे जावे लागले.**

■ ओस्लो

**पाचव्या** फेरीतील सर्वाधिक चर्चेत असलेला सामना ग्रँडमास्टर्स गुकेश आणि प्रज्ञानंद यांच्यात खेळला गेला. सामन्याच्या बहुतांश वेळेत प्रज्ञानंद चांगल्या स्थितीत होता आणि त्याने नियंत्रण राखले होते. मात्र, अंतिम टप्प्यात गुकेशने संधी साधली. वेळेच्या दबावाखाली आणि वाढत्या तणावामुळे प्रज्ञानंदला आपली आघाडी टिकवता आली नाही. यानंतर गुकेशने परिस्थितीवर पूर्ण नियंत्रण मिळवले आणि विजय मिळवण्यात यश मिळवले.

जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या मॅग्नस कार्लसेनला अमेरिकन वेस्ली सोकडून पराभव पत्करावा लागला. हा सामना बराच काळ डावपेचांची लढाई ठरली, पण खेळाच्या अंतिम टप्प्यात वेस्ली सो याने हळूहळू वर्चस्व मिळवले. कार्लसेनने पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, पण वेस्लीने आपली जागा टिकवून धरली आणि या क्लासिकल सामन्यात एक महत्त्वपूर्ण विजय मिळवला. स्पर्धेत आघाडीवर असलेला अलीरेझा फिरौजा आणि व्हिन्सेंट केमर यांच्यातील सामना अनिर्णित राहिला. त्यानंतरचा आर्मागेडॉन सामना जिंकून फिरौजाने अतिरिक्त गुण मिळवले आणि गुणतालिकेतील आपली आघाडी आणखी मजबूत केली. भारताच्या दिव्या देशमुखने झू जिनरला पराभूत करून दिवसातील एकमेव क्लासिकल विजय नोंदवला. दिवसभर सामना अटीतटीचा होता, पण निर्णायक क्षणी दिव्याने उत्कृष्ट खेळ करत आपल्या आघाडीचे विजयात रूपांतर केले. या विजयामुळे, स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात प्रवेश करण्यापूर्वी दिव्याने गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावले आहे. दुसऱ्या एका सामन्यात युक्रेनच्या ना मुझीचुक आणि बिबिसारा असोबायेवा यांच्यातील क्लासिकल सामना बरोबरीत सुटला. नंतर मुझीचुकने आर्मागेडॉन टायब्रेक जिंकून अतिरिक्त गुण मिळवले. विद्यमान महिला विश्वविजेती जू वेनजुन आणि भारताची कोनेरू हम्पी यांच्यातील क्लासिकल सामनाही बरोबरीत सुटला.

दोन्ही खेळाडूंमध्ये एक रणनीतिक लढाई झाली. परंतु कोणालाही निर्णायक आघाडी मिळवता आली नाही. त्यानंतर सामना आर्मागेडॉनमध्ये पोहोचला, जिथे हम्पीने उत्कृष्ट कामगिरी करत विजय मिळवला आणि अतिरिक्त गुण मिळवले. पाचव्या फेरीनंतर पुरुष गटातील अव्वल स्थानासाठीची शर्यत अधिकच रोमांचक झाली आहे, तर महिला गटात दिव्या देशमुखने विजेतेपदासाठी एक प्रबळ दावेदार म्हणून स्वतःला सिद्ध केले आहे.

# सात्विक आणि चिरागने पटकाविले
## सिंगापूर बॅडमिंटन ओपनचे विजेतेपद

■ सिंगापूर

**भारताची** आघाडीची पुरुष दुहेरी जोडी सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी आज सिंगापूर बॅडमिंटन ओपनच्या दुहेरी पुरुष गटाच्या अंतिम फेरीत इंडोनेशियाच्या फजर अल्फियान आणि मुहम्मद शोहिबुल फिक्री यांचा १८-२१, २१-१७, २१-१६ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. हा थरारक सामना एक तास आणि १३ मिनिटे चालला. या विजयामुळे भारतीय जोडीने आंतरराष्ट्रीय विजेतेपदासाठीची आपली दोन वर्षांची प्रतीक्षा संपवली. त्यांचे यापूर्वीचे विजेतेपद २०२४ च्या थायलंड ओपनचे होते, जे त्यांनी चेन बोयांग आणि लिऊ यी या



चिनी जोडीला हरवून जिंकले होते. स्पर्धेत चौथे मानांकन मिळालेल्या चिराग आणि सात्विक यांनी शनिवारी उपांत्य फेरीत विश्वविजेते किम वॉन हो आणि सेओ सेउंग जे यांना पराभूत करून अंतिम फेरीत धडक मारली.

# रमित टंडन आणि अनाहत सिंग
## ब्रिटिश स्क्वॅश स्पर्धेत पराभूत

**लंडन-** भारताचे अभय सिंग आणि वीर चोत्रानी यांनी ब्रिटिश ओपन स्क्वॅश स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. परंतु रमित टंडन आणि अनाहत सिंग या स्पर्धेतून बाहेर पडले.


अभयने कोलंबियाच्या मटियास नुडसेनचा ११-८, ११-५, ११-४ असा पराभव केला, तर जागतिक क्रमवारीत ४४ व्या क्रमांकावर असलेल्या चोत्रानीने पाकिस्तानच्या नूर जमानचा ११-८, १२-१४, ११-६, ११-७ असा पराभव केला. फ्रेंच खेळाडू डुसॉर्डविरुद्धच्या सामन्यादरम्यान टंडनने मध्यंतरीच माघार घेतली. त्यावेळी हा भारतीय खेळाडू १४-१२, ४-७ ने मागे होता. महिलांच्या गटात जागतिक क्रमवारीत २१ व्या क्रमांकावर असलेली अनाहत जागतिक क्रमवारीत ३६ व्या क्रमांकावर असलेल्या इजिप्शियन खेळाडू नार्डिन गॅरासकडून पराभूत झाली.

# वानखेडे स्टेडियमवर आजपासून मुंबई टी-२० लीगला सुरुवात

■ मुंबई

**'नुवामा** प्रायव्हेट टी-२० मुंबई लीग' आणि पहिल्याच 'टी-२० मुंबई महिला लीग', या स्पर्धेला १ जूनपासून मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर सुरुवात होणार आहे. लीगमधील सहभागी संघांचे कर्णधार काल 'सीझन लाँच' कार्यक्रमासाठी एकत्र आले आणि या दोन्ही लीगच्या नव्या हंगामाचे उद्घाटन केले.

या कार्यक्रमाला मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अजिंक्य नाईक आणि लीग गव्हर्निंग कौन्सिलचे अध्यक्ष राजदीप गुप्ता यांनी उपस्थिती लावली. एका रोमांचक क्रिकेट हंगामाच्या सुरुवातीचा आनंद साजरा करण्यासाठी, पेक्स कौन्सिल व लीग गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य, सर्व ११ संघांचे सदस्य आणि त्यांचे व्यवस्थापक या वेळी एकत्र आले होते. २०१८ मध्ये स्थापन झाल्यापासून 'टी-२० मुंबई लीग' ही क्रिकेट क्षेत्रातील अत्यंत आशादायक गुणवंतांसाठी व्यासपीठ ठरले आहे. त्याशिवाय भारताच्या प्रमुख 'फ्रँचायझी-आधारित'



देशांतर्गत टी-२० स्पर्धांपैकी एक म्हणून तिने आपले स्थान भक्कम केले आहे. आगामी हंगामात, पुरुष आणि महिला अशा दोन्ही स्पर्धांमध्ये नवोदित गुणवंतांच्या जोडीनेच अनेक जागतिक दर्जाचे खेळाडूही सहभागी होताना दिसतील. मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अजिंक्य नाईक म्हणाले की, अजिंक्य रहाणे, शार्दूल ठाकूर आणि श्रेयस अय्यर यांसारख्या खेळाडूंनी मुंबईकडून खेळल्यानंतर भारताचे प्रतिनिधित्व केले; आता ते युवा खेळाडूंसोबत ड्रेसिंग रूम सामायिक करून आपले ज्ञान व अनुभव त्यांना देतील, ही आमच्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे.

# आशियाई स्पर्धेसाठी बीसीसीआयची
## ३० खेळाडूंची संभाव्य यादी जाहीर

■ मुंबई

**आशियाई** क्रीडा स्पर्धेसाठी बीसीसीआयची लगबग सुरू झाली असून बीसीसीआयने सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये जपानमधील ऐची-नागोया येथे होणाऱ्या या स्पर्धेसाठी ३० खेळाडूंची संभाव्य यादी भारतीय ऑलिम्पिक संघटनेकडे सादर केली आहे.

या यादीत वैभव सूर्यवंशीचा समावेश करण्यात आला. तर सध्याचा भारतीय टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव आणि एकदिवसीय कर्णधार शुभमन गिलचे नाव वगळण्यात आले आहे. भारताचा वेस्ट इंडिज दौरा आणि आशियाई क्रीडा स्पर्धा जवळपास एकाच वेळी होणार आहेत. एकदिवसीय संघाचे कर्णधारपद भूषवण्याची शक्यता लक्षात घेऊन शुभमन गिलचा आशियाई क्रीडा संघाच्या यादीत समावेश करण्यात आलेला नाही.

# शिर्सेकर्स महात्मा गांधी अ‍ॅकॅडमीने दुहेरी विजेतेपद पटकावले

**मुंबई - दादर** (प.) येथील शिवाजी पार्कात मुंबई खो-खो संघटनेच्या वतीने सुरू असलेल्या मुंबई महापौर चषक खो-खो स्पर्धेमध्ये उपनगरच्या शिर्सेकर्स महात्मा गांधी अ‍ॅकॅडमीने पुरुषांमध्ये श्री समर्थ व्यायाम मंदिरला आणि महिलांमध्ये सरस्वती कन्या या दोन्ही मुंबईच्या संघांना व व्यावसायिक गटात सेंट्रल रेल्वेने मुंबई पोलिसांना पराभूत करत मुंबई महापौर चषकावर नाव कोरले. पुरुष गटाच्या अंतिम सामन्यात शिर्सेकर्स महात्मा गांधी अ‍ॅकॅडमीने श्री समर्थ व्यायाम मंदिरचा ११-९ (मध्यंतर ११-५) असा १ डाव व २ गुणांनी मोठा पराभव केला. या सामन्यात शिर्सेकर्सच्या रामचंद्र झोरे (२.२०, २.३० मि. संरक्षण व १ गुण), धीरज भावे (२, २.३० मि. संरक्षण व १ गुण), प्रतिक देवरे (२ मि. संरक्षण), ऋषिकेश मूर्चावडे (१.४० मि. संरक्षण), निहार दुबळे (५ गुण) यांनी मुंबई महापौर चषकावर नाव कोरले.

# परळमध्ये शालेय कॅरम स्पर्धा
## आजपासून ३२ खेळाडूंत चुरस

■ मुंबई

**आयडियल** स्पोर्ट्स अ‍ॅकॅडमी-ग्रुप व राष्ट्रीय मिल मजदूर संघातर्फे अमृत महोत्सवी क्रीडापटू गोविंदराव मोहिते ट्रॉफी १६ वर्षांखालील मुलामुलींच्या विनाशुल्क कॅरम स्पर्धेस १ जून रोजी प्रारंभ होणार असून, विविध जिल्ह्यांतील ३२ खेळाडूंमध्ये चुरस राहील. परेल येथील आरएमएमएस सभागृहात डोंबिवलीच्या पाटकर विद्यालयाचा नील म्हात्रे विरुध्द कुर्ल्यातील मायकल हायस्कूलचा निखिल भोसले यांच्यामध्ये उद्घाटनीय लढत होईल. आयडियल अ‍ॅकॅडमीचे कार्याध्यक्ष गोविंदराव मोहिते यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शालेय खेळाडूंना डीएसओ कॅरम स्पर्धेच्या तयारीसाठी सरावात्मक स्पर्धा आयोजित केली. विजेतेपदाच्या दावेदारीसाठी जैतापूरच्या न्यू इंग्लिश स्कूलचा आर्यन राऊत, मालाडच्या पोद्दार हायस्कूलचा प्रसन्न गोळे व पुष्कर गोळे, कळसुलकर इंग्लिश स्कूलचा भरत सावंत, महात्मा गांधी विद्यामंदिरची तनया दळवी, कनोसा हायस्कूलची वेदिका पोमेंडकर आदी कॅरमपटू खेळ करण्यासाठी सज्ज आहेत.

महावितरण

**ई-निविदा सूचना**

दि. ०१.०६.२०२६ रोजी महावितरणतर्फे कणकवली विभागाअंतर्गत नवीन विद्युत जोडणी लघुदाब वाहिनी दुरुस्तीच्या कामासाठी एक वर्षाच्या करारावर परवानाधारक विद्युत ठेकेदारांची नामिका प्रविष्ठ (empanellment) करण्यासाठी स्वतंत्र निविदा क्र.०१/२०२६-२७ मागविण्यात येत आहे.

| Sr. No. | Tender No | Tender Name | Earnest Money Deposit (EMD) |
|---|---|---|---|
| 1 | EE/KVL/T/BML T/T-01 OF 2026-27 | Empanelment of Agencies for Breakdown Maintenance of LT overhead lines , LT underground cables, & Fuse calls in Kankavali Division of Sindhudurg Circle. | 10000/- |

सविस्तर ई-निविदा https://works.mahadiscom.in/eTender/etender संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत आहेत. ई-निविदा भरण्याची अंतिम मुदत दि. १०.०६.२०२६ वेळ ११:०० अशी आहे. सदर निविदांचे शुल्क व लागू असणारे बयाणा शुल्क ऑनलाईन पध्दतीने स्विकारले जातील. अधिक माहितीसाठी विभागीय कार्यालय, कणकवली फोन नं. ७८७५७६५०८१ यांचेशी संपर्क साधावा.

कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वि.कं. मर्या. कणकवली विभाग, कणकवली

PRO NO-KZR/35/2026-27 dtd 29.05.2026.

नवा काळ
Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in



# ‘इश्क दम और इडली रसम’चे चित्रीकरण पूर्णत्वास

**अभिनेत्री** शायनी दोषी आणि अभिनेता अभिषेक कुमार यांनी त्यांच्या आगामी ‘इश्क दम और इडली रसम’ या मालिकेच्या पहिल्या भागाचे (सीझन) चित्रीकरण पूर्ण केले आहे. एकता कपूर यांच्या बालाजी टेलिफिल्म्स निर्मित या मालिकेच्या सेटवरील एक व्हिडिओ शेअर करत दोन्ही कलाकारांनी चित्रीकरण पूर्ण झाल्याची (रॅप अप) माहिती चाहत्यांना दिली आहे.

या व्हिडिओमध्ये शायनी आणि अभिषेक त्यांच्या या भागातील शेवटच्या दृश्याचे चित्रीकरण करताना दिसत आहेत. चित्रीकरण पूर्ण करताना त्यांनी सेटवरील अनुभव, इतर कलाकार, तंत्रज्ञ आणि प्रेक्षकांचे आभार मानले आहेत. पहिल्या भागाच्या प्रवासादरम्यान तयार झालेल्या आठवणींना उजाळा देत त्यांनी सेटवरील गमतीजमती आणि सहकाऱ्यांसोबत घालवलेला वेळ खूप आठवेल, अशा भावना व्यक्त केल्या आहेत. या निरोप विधानातून मालिकेच्या संपूर्ण चमूमध्ये असलेले सलोख्याचे संबंध अधोरेखित झाले आहेत.

‘इश्क दम और इडली रसम’ या मालिकेच्या माध्यमातून शायनी दोषी आणि अभिषेक कुमार ही नवी जोडी पहिल्यांदाच पडद्यावर एकत्र आली असून, प्रेक्षकांकडून त्यांच्या ऑन-स्क्रीन केमिस्ट्रीला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. या मालिकेच्या दुसऱ्या भागाबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नसली, तरी पहिल्या भागाचे यशस्वी चित्रीकरण पूर्ण होणे हा या मालिकेच्या संपूर्ण टीमसाठी एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.





# नुपूर झाली बाजूला...

**नेटफ्लिक्स** इंडियाच्या ‘द रॉयल्स’ या रोमँटिक कॉमेडी वेब मालिकेच्या दुसऱ्या भागासाठी दिग्दर्शनात मोठा बदल करण्यात आला आहे. इशान खट्टरची मुख्य भूमिका असलेल्या या मालिकेच्या दुसऱ्या हंगामाच्या दिग्दर्शनाची धुरा आता ‘डार्लिंग्स’ चित्रपटाची दिग्दर्शिका जसमीत के. रीन हिच्याकडे सोपवण्यात आली आहे. पहिल्या भागाचे दिग्दर्शन नुपूर अस्थाना आणि प्रियांका घोष यांनी केले होते. परंतु नुपूरने तिच्या इतर व्यावसायिक कमिटमेंटस्‌मुळे या मालिकेतून बाजूला होण्याचा निर्णय घेतला आहे. ती सध्या एकता कपूर यांच्या निर्मिती संस्थेच्या एका वेगळ्या नेटफ्लिक्स मालिकेवर काम करत आहे, तर प्रियांका घोष या मालिकेशी जोडलेली राहणार आहे.

# सेलिनाला बजावल्या नोटीस

**अभिनेत्री** सेलिना जेटली हिला तिचे पती पीटर हाग आणि सासरे वोल्फगांग जे. हाग यांच्याकडून दोन कायदेशीर नोटीस बजावण्यात आल्या आहेत. मुंबईतील ‘सेमवाल अँड कंपनी’ या लॉ फर्मने जारी केलेल्या पत्रकानुसार या नोटिसेस पाठवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या काही महिन्यांत सोशल मीडिया, विविध मुलाखती आणि डिजिटल माध्यमांमधून हाग कुटुंबाविषयी करण्यात आलेल्या विधानांच्या आणि आरोपांच्या पार्श्वभूमीवर ही कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, यातील एक नोटीस पीटर हाग यांचे वडील आणि सेलिनाच्या मुलांचे आजोबा वोल्फगांग जे. हाग यांच्याकडून पाठवण्यात आली आहे, तर दुसरी नोटीस स्वतः पीटर हाग यांनी पाठवली आहे. आपली बदनामी आणि तीन अल्पवयीन मुलांची गोपनीयता व त्यांचे हित लक्षात घेऊन पीटर यांनी हे पाऊल उचलले आहे. सध्या ऑस्ट्रियामधील न्यायालयात या दोघांमधील वैवाहिक वाद आणि मुलांच्या ताब्याविषयीची (कस्टडी) कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. असे असतानाही माध्यमांमध्ये आणि सोशल मीडियावर पीटर व त्यांच्या कुटुंबावर घरगुती हिंसाचार, मानसिक छळ, धमकी देणे, मुलांचे बेकायदेशीर स्थलांतर आणि धार्मिक कट्टरतेशी संबंधित अनेक खोटे आरोप केले जात असल्याचा दावा हाग कुटुंबाने केला आहे.

# रामगोपाल वर्मांचा घणाघात



**निर्माते** आणि दिग्दर्शक राम गोपाल वर्मा यांनी फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया सिने एम्प्लॉईज (एफडब्ल्यूआयसीई) या चित्रपट क्षेत्रातील शिखर संघटनेवर तीव्र शब्दांत टीका केली आहे. आगामी ‘डॉन ३’ या चित्रपटावरून अभिनेता रणवीर सिंग विरोधात असहकाराचे निर्देश जारी करणाऱ्या या संघटनेचा उल्लेख वर्मा यांनी ‘कांगारू कोर्ट’ असा केला असून, हा निर्णय म्हणजे एक मोठी जनसंपर्क आपत्ती असल्याचे म्हटले आहे.

या चित्रपटाच्या प्री-प्रोडक्शन कामासाठी निर्माते रितेश सिधवानी आणि दिग्दर्शक फरहान अख्तर यांच्या एक्सेल एंटरटेनमेंटने लंडनमध्ये काही तज्ज्ञांची नियुक्ती केली होती. यामध्ये काही तंत्रज्ञ आणि नृत्यदिग्दर्शकांचा (कोरिओग्राफर) समावेश होता. या नियुक्तीमुळे भारतीय तंत्रज्ञ आणि कामगारांच्या रोजगारावर गदा येत असल्याचा दावा करत एफडब्ल्यूआयसीईने आक्षेप घेतला होता. चित्रपट संघटनेने मुख्य अभिनेता रणवीर सिंगला या परदेशी तंत्रज्ञांसोबत काम न करण्याची ताकीद दिली होती आणि तसे न केल्यास त्याच्या विरोधात असहकार पुकारण्याचा इशारा दिला होता. या संपूर्ण प्रकरणावर राम गोपाल वर्मा यांनी सोशल मीडियावरून आपली नाराजी उघडपणे व्यक्त केली आहे. त्यांनी लिहिले की, एखाद्या चित्रपट संघटनेने थेट अभिनेत्याला लक्ष्य करणे आणि त्याला धमकावणे अत्यंत चुकीचे आहे. चित्रपट निर्मिती हा एक जागतिक व्यवसाय आहे आणि दिग्दर्शकाला किंवा चित्रपट निर्मिती संस्थेला त्यांच्या गरजेनुसार जगातील कोणत्याही कोपऱ्यातून तंत्रज्ञ निवडण्याचा पूर्ण अधिकार आहे.



# राहुलविषयीच्या अफवांवर दीपकचा खुलासा

**अभिनेता** दीपक तिजोरी याने त्याचा जुना मित्र आणि ‘आशिकी’ चित्रपटातील सह-कलाकार राहुल रॉय याच्या आरोग्याविषयी सोशल मीडियावर पसरणाऱ्या सर्व अफवा फेटाळून लावल्या आहेत. राहुल रॉय पूर्णपणे सुरक्षित आणि बरा आहे, असे सांगत दीपकने चाहत्यांना चिंता न करण्याचे आवाहन केले आहे. गेल्या काही दिवसांत राहुल रॉयचे काही व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते, ज्यानंतर नेटीझन्सकडून त्याच्या प्रकृतीविषयी आणि बोलण्याच्या पद्धतीविषयी चिंता व्यक्त केली जात होती, तर काहींनी त्यावर टीकाही केली होती. २०२० मध्ये कारगिलमध्ये एका चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान राहुल रॉयला ब्रेन स्ट्रोक (मेंदूचा झटका) आला होता. त्यातून तो हळूहळू बरा होत आहे. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर दीपक तिजोरीने स्पष्ट केले की, तो राहुलच्या नियमित संपर्कात आहे. राहुल अजूनही त्याचा भाऊ आणि चांगला मित्र असून, कोणत्याही कारणाशिवाय या अफवा पसरवल्या जात आहेत. कलाकारांच्या आयुष्याबद्दल अशा खोट्या गोष्टी लिहिल्या जाणे हा या क्षेत्राचा एक भाग बनला असून, अशा चर्चांना महत्त्व देण्याची गरज नाही, असे दीपकने म्हटले आहे.

## हेल्दी Me

### हेल्दी टिप्स

*राजगिऱ्याला चिनी पालक असेही म्हटले जाते. जगभरात ही वनस्पती आढळून येते. या पालेभाजीत भरपूर जीवनसत्त्वे म्हणजे ए, बी१, बी२ आणि सी आदी जीवनसत्त्वे असतात. तसेच त्यात कॅल्शिअम, पोटॅशिअम आणि लोह यांसारखी खनिजे असतात.*



*राजगिऱ्याच्या भाजीमध्ये रक्तशुद्धी करण्याचे आणि रक्तातील विषारी पदार्थ बाहेर टाकण्याचे गुण असतात. रक्तशुद्धीसाठी राजगिरा हा सर्वात उत्तम घरगुती उपाय आहे. यासाठी राजगिऱ्याच्या भाजीची पाने आणि १ ग्रॅम वेलची पावडर घ्यावी. त्याचा रस काढण्यासाठी ते मिक्सरच्या भांड्यात घालून फिरवावे. आता त्यात वेलची पावडर घालावी आणि मिश्रण एकत्र करून घ्यावे. आठवड्यातून एक ते दोन वेळा या मिश्रणाचे सेवन अवश्य करावे.*

*खर पडणे म्हणजे काय? शरीरासाठी अन्नग्रहण करणे जितके आवश्यक असते, तितकेच शरीरातील अनावश्यक घटक आणि विषद्रव्ये बाहेर टाकण्याची क्रियाही आवश्यक असते. त्यामुळे लघवी आणि मलत्याग यांवरही लक्ष ठेवून राहणे गरजेचे असते. अनेकदा आजारांचे संकेत यातून मिळतात. उदाहरणार्थ, उष्ण आणि क्षारयुक्त पदार्थ भक्षण केल्याने, रक्तामध्ये क्षारांचे प्रमाण जास्त वाढते. रक्तातील अशुद्ध द्रव मूत्रपिंडात शोषला जातो. त्या द्रवाबरोबर क्षारही मूत्रपिंडात येतात. त्यामुळे तो पातळ असा द्रव मूत्राशयात येतो. मूत्राशय फुगले की लघवी होते. ती गढूळ असते.*

# दृष्टीदोषांकडे दुर्लक्ष नको



**मानवी** डोळा हा अत्यंत प्रगत आणि संवेदनशील अवयव आहे. कॅनडाच्या ‘असोसिएशन ऑफ ऑप्टोमेट्रिस्टनुसार, डोळ्यांची क्षमता सुमारे ५७६ मेगापिक्सेल इतकी असते. इतका शक्तिशाली अवयव असूनही, आपण अनेकदा डोळ्यांच्या तपासणीकडे दुर्लक्ष करतो. पण दातांच्या आरोग्याप्रमाणेच डोळ्यांची दर सहा महिन्यांनी तपासणी करणे आवश्यक आहे. कारण अंधत्वाची अनेक कारणे वेळेत निदान झाल्यास पूर्णपणे टाळता येतात. पण बहुतेकांना त्याविषयी माहितीच नसते.

एकाएकी दृष्टी अंधुक होणे, विशेषतः एकाच डोळ्याने स्पष्ट न दिसणे, हे धोक्याचे लक्षण आहे. हे लक्षण मिनी स्ट्रोक (टीआयए), काचबिंदूची (ग्लॉकोमा) सुरुवात, मधुमेहामुळे होणारा रेटिनोपॅथी हा आजार किंवा डोळ्यांच्या पडद्याशी संबंधित समस्यांचे संकेत असू शकते.

डोळ्यांसमोर लहान काळे ठिपके किंवा कोळ्याच्या जाळ्यासारखे तंतू फिरताना दिसणे (फ्लोटर्स) ही सामान्य बाब असली, तरी त्यांचे प्रमाण अचानक वाढणे आणि त्यासोबत प्रकाशाचे झोत दिसणे ही आणीबाणीची स्थिती असू शकते. याचा अर्थ डोळ्याचा पडदा (रेटिना) फाटत आहे किंवा निखळत आहे, ज्यामुळे कायमचे अंधत्व येऊ शकते.

पेरिफेरल व्हिजन लॉसच्या समस्येत तुम्हाला समोरचे स्पष्ट दिसते, पण बाजूच्या गोष्टी पाहण्यास त्रास होत असेल, तर तो काचबिंदूचा (ग्लॉकोमा) सुरुवातीचा टप्पा असू शकतो. यामध्ये दृष्टीचे क्षेत्र अरुंद होत जाते आणि व्यक्तीला टनेलमधून (बोगदा) पाहत असल्याचा भास होतो.

डबल व्हिजन म्हणजे एकाच वस्तूच्या दोन प्रतिमा दिसणे हे कॉर्नियाशी संबंधित दोष किंवा मोतीबिंदूचे लक्षण असू शकते. जर दोन्ही डोळ्यांना हा त्रास होत असेल, तर तो मज्जासंस्थेशी संबंधित आजार किंवा स्ट्रोकचा इशारा असू शकतो.

सरळ रेषा नागमोडी दिसणे किंवा दृष्टीच्या मध्यभागी काळा ठिपका दिसणे हे वय-संबंधित मॅक्युलर डिजनरेशन (एएमडी) चे लक्षण आहे. ५० वर्षांवरील व्यक्तींमध्ये दृष्टी जाण्याचे हे एक मुख्य कारण असून याचे वेळेत निदान होणे अत्यंत गरजेचे आहे.



# रात्रीच्या जेवणानंतर फळे खावीत का?

***रात्रीच्या जेवणानंतर गोड पदार्थ म्हणून किंवा निरोगी सवय म्हणून फळे खाण्याची सवय अनेकांना असते. मात्र, ही सवय पचनसंस्थेसाठी अत्यंत त्रासदायक ठरू शकते, असा इशारा पचनविकार तज्ज्ञांनी दिला आहे. यामुळे केवळ पचनाच्या तक्रारीच नव्हे, तर झोपेवरही विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते.***

**फळांमध्ये** मुबलक प्रमाणात नैसर्गिक साखर (फ्रुक्टोज) आणि फायबर असतात. फळे पचण्यासाठी शरीराला खूप कमी वेळ लागतो. मात्र, जेव्हा आपण जड जेवणानंतर लगेच फळांचे सेवन करतो, तेव्हा ती आधीच पोटात असलेल्या अन्नामुळे पचनमार्गात अडकतात. परिणामी, फळांमधील साखरेचे पोटातच आंबायला (फर्मेन्टेशन) सुरुवात होते. या प्रक्रियेमुळे गॅस निर्माण होऊन पोट फुगणे (ब्लोटिंग) आणि अस्वस्थता जाणवण्यासारखे त्रास सुरू होतात.


चयापचय आणि झोपेवर परिणाम

रात्रीच्या वेळी मानवी शरीराची चयापचय क्रिया (मेटाबॉलिझम) नैसर्गिकरित्या मंदावलेली असते. अशा स्थितीत फळांमधील साखरेमुळे रक्तातील शर्करेची पातळी अचानक वाढू शकते. शरीराला रात्रीच्या वेळी अशा अतिरिक्त ऊर्जेची गरज नसते, ज्यामुळे झोप मिळण्यास अडथळे येतात. तसेच, संत्री किंवा द्राक्षांसारखी आम्लयुक्त फळे रात्री खाल्ल्यास ‘ॲसिड रिफ्लक्स’ किंवा छातीत जळजळ होण्याचा त्रास वाढू शकतो. विशेषतः ‘इरिटेबल बॉवेल सिंड्रोम’ (आयबीएस) सारख्या समस्या असलेल्या रुग्णांनी ही सवय टाळणे आवश्यक आहे.

आरोग्यदायी पर्याय कोणता?

पचनक्रिया सुरळीत राहण्यासाठी फळे खाण्याची सर्वोत्तम वेळ ही सकाळची किंवा दोन जेवणांच्या मधल्या काळातील (स्नॅक्स म्हणून) असते. जर रात्री फळे खायचीच असतील, तर जेवण आणि फळ यामध्ये किमान दोन ते तीन तासांचे अंतर राखणे गरजेचे आहे. केवळ पोषक आहार घेणे पुरेसे नसून, तो योग्य वेळी घेणे आरोग्यासाठी तितकेच महत्त्वाचे आहे. रात्रीच्या जेवणानंतर लगेच फळे खाण्याऐवजी ती दिवसा घेतल्यास शरीराला त्यातील जीवनसत्त्वे आणि खनिजांचा पूर्ण लाभ मिळू शकतो.

यसाका लिक्वीड औषधी
यात आहे हळद आणि गुळवेल जे इम्युनिटी वाढवण्यास मदत करते
कारले, जांभूळ, कडुलिंब इत्यादि १२ वनौषधींचे सुयोग्य आयुर्वेदिक मिश्रण
• ग्लुकोज मेटॅबॉलिजममध्ये मदत होते,
• थकवा कमी करते • पचनक्रिया सुधारते
• प्रतिकार शक्ती वाढवते • रक्त शुध्द करते
• जखम बरी होण्यास मदत करते
To Order Scan Here
A quality product from Simandhar
HELPLINE NO.: 7045355632



# समस्या स्लो बर्नची



***भारतात सध्या एक अदृश्य आरोग्य संकट उभे राहिले आहे. अनेकजण दिसायला तंदुरुस्त असले, तरी त्यांना सुप्त दाहाची समस्या भेडसावत असते. या स्थितीला ‘स्लो बर्न’ असे संबोधत आहेत. मधुमेह, हृदयविकार आणि फॅटी लिव्हर यांसारख्या आजारांच्या वाढत्या प्रमाणामागे हेच मुख्य कारण असल्याचे समोर आले आहे.***

**भारतीयांमध्ये** ‘थिन-फॅट फिनोटाईप’ ही स्थिती मोठ्या प्रमाणावर दिसून येते. यात व्यक्तीचा ‘बीएमआय’ सामान्य असतो. परंतु पोटाच्या अंतर्गत अवयवांभोवती घातक चरबी साठलेली असते. ही चरबी केवळ निष्क्रिय मांस नसून ती एका ग्रंथीप्रमाणे काम करते आणि शरीरात सतत दाह निर्माण करणारे घटक सोडत असते. जनुकीय रचनेमुळे दक्षिण आशियाई लोकांमध्ये त्वचेखाली चरबी साठवण्याची मर्यादित क्षमता असल्यामुळे ही अतिरिक्त चरबी थेट यकृत आणि हृदयाभोवती जमा होते.

आहारातील अतिप्रक्रिया केलेले पदार्थ, शुद्ध कर्बोदके आणि साखरेचा अतिवापर यामुळे हा दाह अधिक तीव्र होतो. फायबरचा अभाव असलेल्या आहारामुळे आतड्यांमधील सूक्ष्मजीवांचे संतुलन बिघडून त्याचा परिणाम शरीराच्या रोगप्रतिकारक शक्तीवर होतो. याव्यतिरिक्त, हवेचे वाढते प्रदूषण आणि अपुरी झोप हे घटकही आगीत तेल ओतण्याचे काम करत आहेत. संशोधनानुसार, रात्रीची झोप पूर्ण न झाल्यामुळे शरीरातील ‘सी-रिॲक्टिव्ह प्रोटीन’ वाढते. अंतर्गत सूज किंवा दाहाचे ते निदर्शक असते.

या समस्येवर मात करण्यासाठी आहारात आमूलाग्र बदल करणे आवश्यक आहे. हळद आणि काळी मिरी यांचे मिश्रण नैसर्गिक दाहशामक म्हणून कार्य करते. आहारात हिरव्या पालेभाज्या, ओमेगा-३ युक्त पदार्थ आणि प्रथिनांचा समावेश वाढवणे गरजेचे आहे. केवळ वजन कमी करण्यापेक्षा शरीरातील चरबीचे प्रमाण संतुलित ठेवण्यावर भर दिला पाहिजे. नियमित शारीरिक हालचाल, तणावमुक्ती आणि किमान सात ते आठ तासांची गाढ झोप हे या ‘स्लो बर्न’ला रोखण्याचे प्रभावी मार्ग आहेत.

# व्हाईट सॉस पास्ता खाताय?

इटालियन खाद्यपदार्थांमधील ‘व्हाईट सॉस पास्ता’ हा अनेकांचा, विशेषतः तरुणाईचा अत्यंत आवडीचा पदार्थ आहे. मात्र, आयुर्वेद तज्ज्ञ यांच्यामते या पदार्थाच्या वारंवार सेवनाने काही गंभीर समस्या उद्भवू शकतात. व्हाईट सॉस पास्ता बनवताना वापरले जाणारे घटक हे आयुर्वेदानुसार ‘विरुद्ध आहार’ या श्रेणीत येतात आणि ते आरोग्यासाठी घातक ठरू शकतात.

व्हाईट सॉस पास्ता तयार करताना मैदा, लोणी, मीठ आणि दूध या मुख्य घटकांचा वापर केला जातो. आयुर्वेद शास्त्रानुसार, दूध आणि मीठ यांचे एकत्र सेवन करणे हे अत्यंत चुकीचे अन्न संयोजन आहे. दुग्धजन्य पदार्थांसोबत मिठाचा वापर केल्यास शरीरातील दोषांचे संतुलन बिघडते. या विसंगत आहारामुळे ‘विटिलिगो’ म्हणजेच ज्याला आपण सामान्य भाषेत पांढरे डाग म्हणतो, अशा त्वचारोगाचा धोका निर्माण होऊ शकतो. ज्या व्यक्तींना आधीच त्वचेच्या समस्या आहेत, त्यांच्यासाठी असे पदार्थ आजार बळावण्यास कारणीभूत ठरतात.

### कधी ठरते धोकादायक?


कधीतरी एकदा असा पास्ता खाल्ल्याने लगेच आजार होत नाही. मात्र, जर तुम्ही वारंवार बाहेर हॉटेलमध्ये जाऊन किंवा घरच्या घरी बनवून हा पास्ता खात असाल, तर तुम्ही विटिलिगोसारख्या आजाराच्या निशाण्यावर असू शकता. दूध आणि मीठ यांच्या या चुकीच्या संयोगामुळे शरीरात साठलेले टॉक्सिन्स त्वचेवर पांढरे डाग निर्माण करू शकतात आणि हे डाग शरीराच्या इतर भागांत वेगाने पसरण्याची शक्यताही वाढते.

### विटिलिगो म्हणजे काय?

विटिलिगो हा एक त्वचारोग आहे ज्यामध्ये त्वचेच्या विशिष्ट भागातील रंगद्रव्य नष्ट होते. आपल्या त्वचेला नैसर्गिक रंग देणाऱ्या ‘मेलानिन’ या घटकाचे उत्पादन पेशींमधून बंद झाल्यामुळे त्वचेवर पांढऱ्या रंगाचे डाग दिसू लागतात. या बाधित भागातील केसांचा रंगही बदलून ते पांढरे किंवा चंदेरी होतात. त्यामुळे जिभेचे चोचले पुरवताना आपल्या आरोग्याचा आणि विशेषतः शरीरातील अंतर्गत संतुलनाचा विचार करणे आवश्यक आहे.



## नवाकाळ शब्दकोडे-१६२३



**आडवे शब्द –**

२. अतिथी ५. हनुमान, मारुती ८. पीएचडीसाठी सादर केलेले संशोधनपर लेखन ११. लहान पोळी १३. शिसारी १५. पारंब्यांचा वृक्ष १७. धाक १९. खजिना, भांडार २२. उठाव, बंड २३. तीक्ष्ण पाते २६. भुगा, पावडर २७. महाभारतात कंसाचा सासरा २९. काव्य, पद ३२. रोगप्रसार करणारा कीटक ३४. उत्सव ३६. साधुबैरागी ३८. तुसडा, चिडखोर ४१. खिसेकापू ४४. काम, हेतू ४५. संघर्ष, लढा ४६. विमानातील सेविका ४८. शिपाई, अनुचर ४९. उलघाल, वादळ ५२. नवऱ्याचा भाऊ ५३. आदला दिवस ५४. मत्स्य, मीन ५७. मुंबईची ग्रामदेवता ५९. लाकडी पळी ६१. साधुवाण्याची मुलगी ६३. योजना, आखणी ६४. स्तुतिपाठक ६५. तोंडदेखले ६६. लहरी धोरण ६८. माजोरीपणा, धुडगूस ७०. भक्षण, खाद्यपदार्थ ७१. उष्णतेमुळे होणारी अंगाची आग ७२. कोणत्याही हिरव्या फळांचे पंचामृत ७४. पश्चातबुद्धी ७५. शिखा ७७. देव ७८. कमला, लक्ष्मी ७९. धार्मिक व्रत ८०. मागचे वर्ष ८२. नोटा छापण्याचे ठिकाण ८४. डोळे, चक्षू ८५. जवळच्याच लोकांना ज्ञात असलेले गुपित ८८. शिफारस, स्तुती ९०. श्वसनमार्गाचा मोठा आजार, अस्थमा ९१. दरिद्री, निर्धन ९२. आघाताची खूण ९४. उशीचे कव्हर ९५. बकरा ९७. बाहेरचा ९९. एजंट, दलाल १०१. सतरावे नक्षत्र १०४. मोगऱ्याची जात १०६. हिंदीत श्रीकृष्ण १०८. भीती ११०. रड्या माणूस, निराशावादी १११. तुती, तुरेदार पोपट ११२. मोठेपणा, थोरवी ११३. सरहद

**उभे शब्द –**

१. हिमालयाची कन्या, पार्वती ३. तल्लख बुद्धीचा ४. नांगराचे पाते ६. निकटचा संबंध ७. जोर ९. जहाजांचे स्थानक १०. जमीन १२. काम टाळणारा १३. काठ, तट १४. संपूर्ण १६. जरच्या जोडीचा शब्द १८. नृपती २०. बायको २१. मिठागर २३. धान्य २४. झणझणीत पंजाबी वरण २५. पक्का, दृढ २८. कामगारांचे आंदोलन ३०. नवरदेवाची आई ३१. मीपणा, गर्व ३३. जमीन आणि आकाश टेकल्यासारखे दिसतात ते ठिकाण ३४. प्रारब्धदेवता ३५. शिल्लक, शेष ३७. दालचिनी ३९. बरोबर ४०. दुधाचा घट्ट पदार्थ ४१. करंजीचे आवरण ४२. डाक, पत्र ४३. जिनसांची यादी ४५. पहाट, उषःकाल ४७. रागावून बोलणे, रागे भरणे ५०. व्रात्य ५१. स्वातंत्र्यसैनिकांना प्रेरणा देणारे गीत ५३. कोझिकोडे बंदराचे जुने नाव, वॉस्को द गामा प्रथम याच बंदरावर उतरला होता ५५. जागरूक, दक्ष ५६. ऐकलेले ५८. अपशकुन ६०. देवाने दिलेला आशीर्वाद ६१. रवाळ ६२. चापबाण ६३. न भिणारा ६४. तांदळाचा मुख्य पदार्थ ६७. लग्नातून जुळलेले नातेसंबंध ६८. चष्मा ६९. मृत्तिका ७०. नदी जेथे समुद्राला मिळते, तेथील पाण्याचा टापू ७३. सभ्य, चाकोरीबद्ध जगणारा ७५. मारुतीच्या मूर्तीवरचा लेप ७६. न थांबता, अविरत ७७. सोपे ८०. निरुपयोगी सामानाचा पसारा ८१. अन्नाचा घास ८३. हाक ८४. सुईचे छिद्र ८५. उदी, विभूती ८६. फुलाची पाकळी ८७. करुणा ८९. लक्षावधी ९१. मज्जासंस्थेचा विकार, हातापायांना कंप सुटणे, थरथरणे ९३. फुलांचा गुच्छ ९५. परवानगी ९६. किंचित ९८. साह्य ९९. प्रहार १००. पक्षाघात, अर्धांगवायू १०२. हिंमतवान १०३. स्वच्छंद १०४. मृदू १०५. कठीण प्रसंग १०७. प्रहर १०९. विष्णूची पत्नी •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६२२ चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. कमीज ४. श्रीपाद ६. गोवर्धन ९. गडवा ११. लांबण १२. हातखंडा १३. उमग १४. गहाण १५. खनिज १७. डवरणे १९. रसद २१. गौरी २२. परज २५. खळ २७. सर २८. धास्तावलेला ३१. बहर ३२. वळणदार ३४. मुकादम ३६. चिखल ३७. डेरा ३८. कोडगा ३९. खण ४०. पातक ४१. खुजा ४२. फसवा ४३. माला ४४. यक्षकर्दम ४७. वखार ४९. नमन ५२. तट ५३. रसभरित ५६. मालक ५७. झोड ५८. बीज ६०. कायम ६१. वसुमती ६२. रंजक ६४. प्रतिपाळ ६६. जमा ६७. बदला ६९. भाक ७१. मारा ७३. वानरी ७४. सट्टा ७५. शर्वरी ७६. षडानन ७८. जहाल ७९. न्यारा ८०. माय ८१. तरणी ८३. गरज ८४. वपन ८६. टाक ८७. उलघाल ८९. वहाण ९१. हल्ला ९२. तसबीर ९३. टोप ९४. शीतक ९६. वनचर ९८. दीन ९९. फुका १०१. हावरा १०२. वजीर १०३. गड १०४. लवलाही १०६. कर १०७. मराठी १०८. टवटवीत १०९. अगस्ती

**उभे शब्द** : १. पलांडू २. कणखर ३. जहाज ४. श्रीखंड ५. पाडाव ६. गोम ७. वगर ८. नगद ९. गणगौळण १०. वाणी १३. उणे १६. निजधाम १८. रब्बी २०. सखी २२. परका २३. अवचित २४. मोहरा २५. खळगा २६. वैरण २७. समुदाय २९. लेखक ३०. लाल ३१. बडेजाव ३२. वडवानल ३३. दाखला ३५. दणकट ३८. कोस ४०. पामर ४२. फर ४३. मान ४५. क्षतज ४६. परिमल ४८. खानेसुमारी ५०. मकरंद ५१. पूड ५४. सकाळ ५५. भय ५६. माती ५७. झोक ५८. बीजभाषण ५९. गतिमान ६१. वजनदार ६३. जलाशय ६५. पारा ६७. बट्टा ६८. परीक्षक ७०. कडा ७२. शहाणीव ७४. सराव ७७. नकुल ७८. जर ८०. मानस ८१. तलत ८२. गणना ८३. जहर ८५. पत्तन ८६. टारफुला ८७. उपहार ८८. घाशीराम ९०. हावरट ९५. कवठी ९७. चऱ्हाट ९८. दीड १००. काहील १०३. गत १०४. लग १०५. वस्ती

# जरांगे उपोषणाला बसताच नेहमीप्रमाणे मंत्री भेटायला धावले

पान १ वरून

आंदोलनाची हिच पद्धत राहिली आहे. त्यांनी उपोषण सुरू करावे आणि मंत्र्यांनी धावाधाव करून तात्पुरती मलमपट्टी करावी, अशी कातडी बचाव भूमिका सरकार सातत्याने घेत आहे. मराठ्यांच्या आरक्षणाच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत गांभीर्याने चर्चा करून सर्वंकष निर्णय घ्यावे असे मात्र सरकारला वाटत नाही. केवळ जरांगे-पाटील उपोषणाला बसले की मगच धावाधाव करायची आणि उपोषण मिटविण्यासाठी अशक्य असलेल्याही गोष्टी मान्य करायच्या, अशी सरकारची अत्यंत भंपक भूमिका सरकारची दिसत आहे. यामुळेच जरांगे-पाटील वारंवार आंदोलनाची धमकी देत आहेत आणि आपले ध्येय पावलापावलाने पुढे सरकविण्याचा प्रयत्न करतात.

३० मे रोजी जरांगे-पाटील यांनी भरउन्हात बाजा टाकून आंदोलन सुरू केले आणि लगेचच सरकारतर्फे भाजपाचे मंत्री यांनी आंदोलनस्थळी धाव घेतली. त्यांनी केलेल्या चर्चेत कोणताही मार्ग मिळाला नाही. तेव्हा प्रसाद लाड यांनी तेथून पंढरपूरकडे जाण्याचा मार्ग निवडला. यानंतर सरकारने मंत्री विखे-पाटील यांना चर्चेसाठी पाठविले. कालच मंत्री विखे-पाटील उपोषणस्थळी पोहोचले. ते पोहोचल्यानंतर विठ्ठलाचा आशीर्वाद घेऊन प्रसाद लाडही तेथे दाखल झाले. जरांगे-पाटील यांनी नेहमीप्रमाणे आपल्या कायदेशीर सल्लागारांना पाचारण केले आणि आपल्या मागण्या पुन्हा एकदा सरकार पुढे मांडल्या. उपोषण सुरू करण्याआधी जरांगे-पाटील यांनी याच मागण्या सातत्याने सरकारपुढे ठेवल्या होत्या. मात्र उपोषण सुरू होईपर्यंत सरकारने त्याकडे लक्षही दिले नाही. उपोषण सुरू होताच याच सरकारने धावाधाव सुरू केली. यामागे नेमके कोणते राजकारण सुरू आहे हे कालांतरानेच कळेल.

उपोषण सोडण्यापूर्वी जरांगे म्हणाले की, सरकारने दिलेल्या मसुद्यानुसार मंगळवार २ जूनपर्यंत आदेश काढण्याची तयारी दाखविल्याने उपोषण मागे घेत आहे. मात्र, दिलेल्या मुदतीत शासननिर्णय न झाल्यास पुन्हा उपोषणाला बसणार आहे. चर्चेदरम्यान महत्त्वाच्या मागण्यांवर सकारात्मक तोडगा निघाला. ५८ लाख नोंदींचे दस्तावेज जरांगेंना दिले जाणार आहे. नोंदी सापडलेल्यांना कुणबी प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत. प्रमाणपत्रे न दिल्यास संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या जाणार आहेत. आता जर ही कारवाई थांबली तर विखे-पाटील आणि प्रसाद लाड जबाबदार असतील. मी त्यांना फोन करणार. जातपडताळणीसाठी विभागीय आयुक्त १५ दिवसांत बैठक घेणार आहेत. सातारा गॅझेटसाठी सरकारला आणखी एक महिना वेळ देत आहोत. कारण घाईघाईने हे गॅझेट लागू केल्यास ते कायदेशीर अडचणीत सापडण्याची शक्यता आहे. त्यामुळे सरकारला महिनाभराचा वेळ देणार आहोत. न्या. शिंदे समितीला एक वर्षाची मुदतवाढ देण्याचे सरकारने कबूल केले आहे. प्रमाणपत्र वैधतेसाठी सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात हेल्पलाईन सुरू करण्यात येणार आहे. विखे-पाटलांचीही स्वतंत्र हेल्पलाईन सुरू करण्यात येईल. मंत्रालयात मराठा आरक्षण कक्ष स्थापन होणार आहे. ज्यांचे कुणबी प्रमाणपत्र निघाल आहे त्यांच्या व्हॅलिडीटी रोखल्या नाही पाहिजेत, हे त्यांनी मान्य केले आहे. बलिदान देणाऱ्या आंदोलकांच्या कुटुंबाला १५ दिवसांत अर्थसहाय्य करणार आहे.

उपोषण संपल्यानंतर मनोज जरांगे यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. आमदार प्रसाद लाड यांनी रुग्णालयात भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. यावेळी आमदार प्रसाद लाड म्हणाले की, मराठा समाजाच्या हितासाठी आम्ही प्रामाणिकपणे प्रयत्न केले. मनोजदादांशी आमचे मतभेद आता संपले असून, सरकारने त्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेतली आहे. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, नेतृत्वाखाली कोणत्याही समाजावर अन्याय होणार नाही. विखे-पाटील यांनी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करूनच १३-१४ मुद्द्यांचा प्रस्ताव दिला आणि तो जरांगे यांनी मान्य केला. समाजासाठी जेवढे काम करता येईल ते आम्ही करू.

# धनंजय देशमुखवांवर जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

बीड

**बीडच्या** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात नवनवीन घडामोडी आणि खुलासे उघडकीस येत आहेत. आता त्यांचा भाऊ धनंजय देशमुख यांच्याविरोधात जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.



धनंजय देशमुख यांचे साडू दादा खिंडकर यांचा सख्खा भाऊ समाधान खिंडकर यांनी या प्रकरणी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, समाधान खिंडकर हे एका हॉटेलमध्ये जेवणासाठी आले होते. यावेळी धनंजय देशमुख यांनी त्यांच्या अंगरक्षकाकडील पिस्तूल काढून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे हॉटेल परिसरात एकच थरकाप उडाला. या तक्रारीच्या आधारे बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी हॉटेलचे सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले आहे. दोन दिवसांपूर्वीच समाधान खिंडकर यांच्याविरोधातही गुन्हा दाखल झाला होता. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील साक्षीदार असलेले त्यांचे मोठे बंधू दादा खिंडकर यांनी समाधान खिंडकर यांच्यावर जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप केला होता. त्या तक्रारीवरून बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला होता. संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी संबंधित व्यक्तींवर परस्परविरोधी आरोप आणि गुन्हे दाखल होण्याच्या घटनांमुळे या प्रकरणातील घडामोडींना नवे वळण मिळाले आहे.

# गर्भलिंगनिदान प्रकरणात दोन डॉक्टरांवर गुन्हा

**पुणे-** दौंड तालुक्यातील केडगाव येथे उघडकीस आलेल्या बेकायदेशीर गर्भलिंगनिदान प्रकरणी यवत पोलिसांनी उरुळी कांचन येथील डॉ. सुंदरम कदम आणि किकवी येथील डॉ. मंदार माळी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईमुळे ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या गर्भलिंगनिदानाच्या संशयित रॅकेटची पाळेमुळे अधिक खोलवर असल्याची चर्चा सुरू झाली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी अण्णासाहेब गिरी याच्याकडून सुरू असलेल्या चौकशीत अनेक धक्कादायक बाबी उघडकीस आल्या आहेत. बेकायदेशीरपणे सोनोग्राफी मशीनचा वापर करून गर्भलिंगनिदान करण्यात येत असल्याचा आरोप असून, हे मशीन आरोपी नरेंद्र ठाकरे याने उपलब्ध करून दिल्याची माहिती तपासात पुढे आली आहे. नरेंद्र ठाकरे सध्या न्यायालयीन कोठडीत आहे.

या प्रकरणात आतापर्यंत पाच जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. डॉ. सुंदरम कदम आणि डॉ. मंदार माळी हे दोघेही सध्या फरार असून त्यांचा शोध घेण्यासाठी यवत पोलिसांकडून विशेष पथके कार्यरत आहेत.मुख्य आरोपी अण्णासाहेब गिरी आणि त्याचा साथीदार डॉ. अतुल जाधव यांना न्यायालयाने पुन्हा दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# मानखुर्दमध्ये तीन बसचा अपघात

बीड

**मानखुर्दमध्ये** रस्त्यावर तेल साडल्यामुळे एका बेस्ट बससह दोन खासगी बसचा अपघातात झाला. तेलामुळे बेस्ट बस चालवणे अवघड झाल्यामुळे ही बस रस्त्याच्या मध्यभागी थांबली होती. त्यानंतर ब्रेक मारून देखील तेलामुळे घसल्याने एक खासगी बस बेस्ट बसला घासून गेली आणि ही खासगी बस रस्त्याच्या मध्यभागी पुढे थांबली. त्यानंतर तिसऱ्या खासगी बसने मागून दुसऱ्या खासगी बसला जोरदार धडक दिली. त्यामुळे तिसऱ्या बसच्या पुढील भागचा चक्काचूर झाला.

# १४० मराठी कुटुंबांच्या पुनर्विकासाकडे दुर्लक्ष

पान ८ वरून

प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आम्ही परिसरात बॅनर लावले होते. मात्र काही वेळातच मुंबई महानगरपालिकेकडे हे बॅनर हटवले. आम्ही कोणावरही वैयक्तिक टीका केलेली नव्हती, कोणाचे नाव घेतले नव्हते. फक्त आमची व्यथा मांडली होती. तरीही आमचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे. विविध निवडणुकांच्या काळात समूह विकास, पुनर्वसन आणि नवीन घरांच्या घोषणा करण्यात आल्या. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनीही परिसराला भेटी दिल्या. मात्र निवडणुका संपल्यानंतर या आश्वासनांची अंमलबजावणी झालेली नाही. पगडीमुक्त मुंबईच्या घोषणा केल्या जातात. मात्र प्रत्यक्षात पगडीधारक आणि जुन्या वाड्यांमधील रहिवाशांचे प्रश्न सुटत नाहीत. सुशोभीकरणाच्या नावाखाली मोठे प्रकल्प राबवले जात असताना, बेघर झालेल्या कुटुंबांना त्यांच्या हक्काचे घर कधी मिळणार, असा सवाल येथील रहिवासी विचारत आहेत.

# नसरापूर चिमुकली हत्या प्रकरण आणखी दोघांची साक्ष नोंदवली

पुणे

**नसरापूर** येथील साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केल्याच्या प्रकरणातील खटल्यात विशेष न्यायालयात आणखी दोन महत्त्वाच्या साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली.

विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांच्या न्यायालयात या खटल्याची दररोज सुनावणी सुरू आहे. यापूर्वी शुक्रवारी पीडित मुलीचे आई-वडील, पंच आणि इतर महत्त्वाच्या साक्षीदारांसह सहा जणांची साक्ष नोंदविण्यात आली होती. त्यानंतर शनिवारी आणखी दोन साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले. या प्रकरणात सरकार पक्षाने एकूण ८२ साक्षीदारांची यादी न्यायालयात सादर केली आहे. त्यापैकी आतापर्यंत आठ जणांची साक्ष नोंदविण्यात आली असून, पुढील साक्षीदारांच्या जबाबांची प्रक्रिया सुरू आहे.

# कोकण विधान परिषदेसाठी तटकरे पिता-पुत्रांनी शिंदेंची भेट घेतली

रायगड

**कोकणातील** विधान परिषदेच्या जागेवरून महायुतीतील घटक पक्ष असलेल्या शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जोरदार संघर्ष सुरू असताना राजकीय घडामोडींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे आणि त्यांचे पुत्र अनिकेत तटकरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. त्यानंतर अनिकेत तटकरे यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचीही भेट घेतल्याने या राजकीय हालचालींना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

कोकणातील ही जागा अनिकेत तटकरे यांनाच मिळावी यासाठी तटकरे गटाकडून जोरदार प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आहे. दुसरीकडे, शिवसेनेकडून मंत्री भरत गोगावले आणि आ. महेंद्र दळवी हे देखील या जागेसाठी आग्रही आहेत. मात्र, सध्याच्या घडामोडीनुसार ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसच्या पारड्यात जाण्याची

# अहिल्यानगरात एसटी बस अपघातात १ ठार! १५ जखमी

अहिल्यानगर



**शिर्डी-** नाशिक महामार्गावर आज सकाळी राज्य परिवहन महामंडळाच्या बस आणि एर्टिगा कार यांच्यात अपघात झाला. या अपघातात एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला असून, १५ जण जखमी झाले आहेत. जखमींवर शिर्डी येथील रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत.

हा अपघात शिर्डीजवळील सावळीविहीर परिसरात घडला. पनवेलहून शिर्डीकडे जाणारी एसटी बस आणि नाशिकच्या दिशेने जात असलेली एर्टिगा कार यांच्यात धडक झाली. अपघाताची तीव्रता इतकी होती की, कारचा अक्षरशः चक्काचूर झाला. तसेच एसटी बसचेही मोठे नुकसान झाले. कारमधील एका प्रवाशाचा जागीच मृत्यू झाला, तर दोन्ही वाहनांतील एकूण १५ जण जखमी झाले.

# शरद पवार बीसीसीआयचे कसे बनले?

पान १ वरून

बाजूला होते. या संघर्षात पैशांचा खेळ आणि घोडेबाजार मोठ्या प्रमाणावर वाढला होता. सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेले निरीक्षक निवडणूक प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी आल्यानंतर तणाव अधिकच वाढला. २९ नोव्हेंबर २००५ रोजी कोलकात्यामध्ये निवडणुका होत्या ते जगमोहन दालमिया यांचे होमग्राऊंड होते. मी अनेक न्यायालयांमध्ये कायदेशीर लढाई लढत होतो आणि हरीश साळवे माझ्या बाजूने उभे होते. निवडणुका सर्वोच्च न्यायालयाच्या दोन निवृत्त न्यायाधीशांच्या देखरेखीखाली पार पाडल्या जाव्यात, असा आदेश मिळवण्यात आम्हाला यश आले. कोणालाही त्या न्यायाधीशांची नावे माहीत नव्हती. आम्हाला 'एकतर्फी आदेश' मिळाला होता. बैठक सुरू झाली तेव्हा असे काही घडणार आहे याची कोणालाच कल्पना नव्हती. दालमिया टेबलवर बसले होते आणि ते आमच्यातील बऱ्याच जणांना अपात्र ठरवणार होते. अगदी योग्य वेळी मी तिथे पोहोचलो आणि सर्वोच्च न्यायालयाचा तो आदेश सादर केला. मी त्यांना सांगितले की, तुम्ही या समितीचे अध्यक्ष राहू शकत नाही. त्यानंतर मोठा गदारोळ झाला. दरवाजे बंद करण्यात आले. पोलिसांचा बंदोबस्त लावावा लागला. सर्वोच्च न्यायालयाचे दोन न्यायाधीश तिथे दाखल झाले. दालमियांना मागे हटावे लागले. आता आम्ही निवडणुका घेणार होतो. अरुण जेटली आणि इतर सर्व वकील हतबल झाले होते, ते ही प्रक्रिया लांबणीवर टाकण्यासाठी पुन्हा न्यायालयात जाण्याचा प्रयत्न करत होते. त्यांना बैठक पुढे ढकलायची होती. जी बैठक अर्ध्या तासात संपायला हवी होती ती संध्याकाळी ५ वाजेपर्यंत चालली. तिथे मोठा तमाशा झाला. २००५ मधील बीसीसीआयच्या या चुरशीच्या निवडणुकीत मतांसाठी पडद्यामागे अनेक गोष्टी सुरू होत्या. बैठकीपूर्वी मतांचे गणित बदलण्यासाठी बोर्डाच्या अनेक सदस्यांना हॉटेलच्या खोल्यांमध्ये डांबून ठेवले होते. तर प्रतिनिधींना घेऊन जाणाऱ्या विमानांचे मार्ग बदलले होते.

आम्ही सुद्धा त्यांच्या काही सदस्यांच्या विमानांचे मार्ग बदलून त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी पाठवले होते. ती एक निवडणूक होती आणि ती कोणत्याही परिस्थितीत जिंकायचीच होती. पण निकाल स्पष्ट होता, आम्ही गुणवत्तेच्या जोरावर जिंकणार होतो. शेवटी आम्ही जिंकलो. राजीव शुक्ला, अनुराग ठाकूर, अरुण जेटली, एन. श्रीनिवासन या सर्वांनी दालमिया यांना मतदान केले होते. तरीही त्यांचा पराभव झाला. त्यामुळे ते कधीच पवारांच्या छावणीत नव्हते. मी मुद्दामहून या लोकांची नावे घेत आहे. ते दुसऱ्या बाजूला होते आणि तेच पैशांचा खेळ करत होते. रुंगटा यांच्यासोबत ते दालमियांचा कोअर ग्रुप होते. ज्यांना नंतर बाहेर काढले. दुसरीकडे आमचा गट होता, जो स्वच्छ आणि गुणवत्तेवर विश्वास ठेवणारा होता. २९ नोव्हेंबर रोजी आमची सत्ता आली. आणि तिथूनच आजच्या आधुनिक क्रिकेटमधील क्रांतीची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली.






# नवाकाळ

• मुंबई । सोमवार १ जून, २०२६ • पान -८




## श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर जूनपासून भाविकांसाठी खुले

**पुणे -** बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असलेले श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर येत्या १५ जूनपासून भाविकांसाठी खुले होणार आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या विकासकामांच्या पार्श्वभूमीवर गेल्या सुमारे पाच महिन्यांपासून मंदिर बंद ठेवण्यात आले होते. मंदिर प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, भाविकांना आता दररोज सकाळी ७ ते ११ या वेळेत दर्शन घेता येणार आहे. मात्र, गर्दी नियंत्रणासाठी दररोज केवळ १,००० भाविकांनाच प्रवेश दिला जाणार आहे. यासाठी ऑनलाईन नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे. पूर्वनोंदणी केल्याशिवाय मंदिरात प्रवेश दिला जाणार नाही.

## मुंबई लोकल, विमानतळ निशाण्यावर दहशतवादी हल्ल्याचा मोठा कट उघड

■ मुंबई

**दिल्ली** पोलिसांच्या स्पेशल सेलने काल दिल्लीतून अटक केलेल्या दहशतवाद्यांच्या चौकशीतून मुंबईवर मोठा हल्ला घडवण्याचा भीषण कट उघडकीस आला आहे. दहशतवाद्यांनी मुंबईतील अनेक संवेदनशील ठिकाणांची रेकी केली होती. यामध्ये दादर रेल्वे स्थानक, अणुऊर्जा केंद्र, मुंबई विमानतळ आणि वीज निर्मिती केंद्रांचा समावेश आहे. या सर्व ठिकाणांचे व्हिडिओही त्यांनी तयार केले होते, जे दिल्ली पोलिसांच्या हाती लागले आहेत.

तपासात आलेल्या माहितीनुसार, आरोपींनी या महत्त्वाच्या ठिकाणांचे व्हिडिओ शूट करून ते पाकिस्तानातील हँडलरना पाठवले होते. त्याआधारे मोठा दहशतवादी हल्ला घडवण्याची तयारी सुरू होती. विशेषतः लोकल रेल्वे आणि दादर स्थानकावर हल्ल्याचा त्यांचा मुख्य डाव होता. या प्रकरणात दाऊद इब्राहिमचा हस्तक मुन्ना झिंगडा आणि आयएसआयच्या इशाऱ्यावर काम करणाऱ्या आंतरराज्य दहशतवादी नेटवर्कमधील एकूण नऊ जणांना अटक करण्यात आली आहे. त्यापैकी महाराष्ट्रातील तौकीर रिझवान अहमद शेख (मुंब्रा), साजिद मेहबूब शेख उर्फ अरबाज खान (कुर्ला) आणि विजय उर्फ शूटर (पुणे) यांचा समावेश आहे. तसेच नेपाळमधील अंग कामी लामा यालाही अटक करण्यात आली आहे.

## मुंबादेवी परिसरात बेवारस बॅग सापडल्याने खळबळ

**मुंबई -** मुंबईतील गजबजलेल्या मुंबादेवी परिसरात आज एका दुकानाबाहेर बेवारस बॅग आढळली. मात्र तपासणीनंतर संबंधित बॅग रिकामी असल्याचे निष्पन्न झाल्याने नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. बॅगेची माहिती मिळताच मुंबई पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत परिसराची नाकेबंदी केली. तसेच खबरदारीचा उपाय म्हणून बॉम्ब शोधक व नाशक पथकही दाखल झाले. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी परिसरातील नागरिकांना सुरक्षित अंतरावर हलवत संबंधित भाग सील केला. वरिष्ठ पोलीस अधिकारीही घटनास्थळी दाखल झाले होते. बॉम्ब शोधक पथकाने संशयास्पद बॅगेची सखोल तपासणी केली. तपासणीनंतर ही बॅग पूर्णपणे रिकामी असल्याचे स्पष्ट झाले.

## मलबार हिल सिमलानगर झोपडपट्टीचा पुनर्विकास कधी? रहिवाशांचा सवाल



■ मुंबई

**मुंबईतील** सर्वात उच्चभ्रू आणि प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या मलबार हिल परिसरात वसलेल्या सिमलानगर झोपडपट्टीतील शेकडो कुटुंबे गेल्या सहा दशकांपासून पुनर्विकासाच्या प्रतीक्षेत आहेत. राज्यपालांचे राजभवन, मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान 'वर्षा' तसेच अनेक मंत्री आणि मान्यवरांची निवासस्थाने हाकेच्या अंतरावर असतानाही सिमलानगरच्या रहिवाशांना अद्याप सुरक्षित आणि कायमस्वरूपी घरांचे स्वप्न पूर्ण झालेले नाही. या झोपडपट्टीचा पुनर्विकास कधी? असा सवाल रहिवासी विचारत आहेत.

सिमलानगर झोपडपट्टी जवळपास १९६५ पासून उभी असून, १९७७-७८ मध्ये तिला अधिकृत झोपडपट्टीचा दर्जा मिळाला. सिटी सर्व्हे क्रमांक ३/४४८ आणि ४४३ या जागेवर वसलेल्या या वस्तीत सुमारे ७२२ झोपड्या आहेत. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या (एसआरए) सर्वेक्षणानुसार सुमारे ६७० रहिवासी पात्र ठरले आहेत. सिमलानगरच्या एसआरए पुनर्विकासासाठी आवश्यक सर्वेक्षण व परिशिष्ट प्रक्रिया पूर्ण झाली असली तरी प्रशासकीय अडचणींमुळे प्रकल्प अद्याप रखडलेला आहे. मलबार हिलच्या उंच टेकडीवर वसलेली या झोपडपट्टीला पावसाळ्यात दरडी कोसळण्याचा धोका असतो. त्यामुळे महापालिकेकडून तिला 'डेंजर झोन' म्हणून नोटिसा दिल्या जातात. माळीणसारखी दुर्घटना येथे घडू नये, यासाठी पुनर्विकासाला गती देण्याची मागणी रहिवाशांनी केली आहे.

सिमलानगरचे रहिवासी सोपान नागोराव कांबळे यांनी सांगितले की, पुनर्विकासासाठी बहुसंख्य झोपडीधारकांनी संमती दिली असून, विकासकाला आवश्यक पाठिंबाही मिळाला आहे. मात्र, जमीन आणि इतर तांत्रिक अडचणींमुळे प्रकल्प पुढे सरकलेला नाही.

## लोढा कुटुंबाच्या आर्थिक मदतीने नूतनीकरण जे. जे. रुग्णालयातील प्रसूती विभागाचा कायापालट





■ मुंबई

**मुंबईतील** भायखळा येथील सरकारी सर जे. जे. रुग्णालयातील प्रसूती विभागाचे (लेबर वॉर्ड) दानशूर व्यक्ती, सामाजिक संस्था आणि देणगीदारांच्या मदतीने नूतनीकरण आणि आधुनिकीकरण करण्यात आले आहे. हे काम नितीन इंदिरा-विष्णू कदम आणि 'टीम ट्रेंड सेटर्स' यांच्या नेतृत्वाखाली झाले. या सुधारित प्रसूती विभागात आता अत्याधुनिक जीवनरक्षक वैद्यकीय उपकरणे आणि सुधारित पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, ज्याचा उद्देश महाराष्ट्रातील या सर्वात मोठ्या सार्वजनिक रुग्णालयांपैकी एकातील माता आणि नवजात बालकांसाठीच्या आरोग्य सेवा अधिक बळकट करणे हा आहे. नूतनीकृत विभागाच्या अधिकृत हस्तांतरणापूर्वी, सर जे. जे. समूह रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. अजय भंडारवार, वैद्यकीय अधीक्षक डॉ. संजय सुरासे आणि विभागप्रमुख डॉ. विजय कल्याणकर यांनी नर्सिंग आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांसह पाहणी केली. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीबद्दल आणि पूर्णत्वास नेण्यासाठी केलेल्या सामूहिक प्रयत्नांबद्दल अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. हे नूतनीकरण प्रकल्प मंगलप्रभात लोढा यांच्या स्नुषा शीतल यांच्या फाऊंडेशन व इतर दानशूरांच्या आर्थिक सहकार्यातून पूर्ण झाला. रुग्णालयातील अधिकाऱ्यांनी सांगितले की, या पुढाकारामुळे समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील गर्भवती माता आणि नवजात बालकांसाठीच्या

### माता, नवजात बालकांसाठी सुरक्षितता

रुग्णालय प्रशासनाने माता आणि नवजात बालकांच्या आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी प्रसूती विभागाच्या दुरुस्ती, नूतनीकरण, सुशोभीकरण आणि उपकरणांच्या खरेदीसाठी मदतीचे आवाहन केले होते. या प्रकल्पाचे काम सर जे. जे. रुग्णालयाचे प्रशासन, वैद्यकीय, निमवैद्यकीय आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहकार्याने पूर्ण करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. हा पुढाकार केवळ पायाभूत सुविधांचा विकास नसून एक मानवतावादी प्रयत्न असल्याचे सांगत आयोजकांनी म्हटले की, नूतनीकरण केलेला प्रसूती विभाग हा माता आणि नवजात बालकांसाठी प्रतिष्ठा, सुरक्षितता आणि सहानुभूतीपूर्ण सार्वजनिक आरोग्यसेवेचे प्रतीक आहे.

## ओव्हरहेड वायर तुटल्याने मध्य रेल्वेची वाहतूक विस्कळीत

■ मुंबई

**मध्य** रेल्वेच्या मुख्य मार्गावरील सायन आणि माटुंगा स्थानकांदरम्यान आज सकाळी ओव्हरहेड वायर तुटल्याने रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाला. या तांत्रिक बिघाडामुळे मध्य रेल्वेवरील लोकल तसेच काही लांब पल्ल्याच्या गाड्या सुमारे २० मिनिटे उशिराने धावल्या. परिणामी सकाळच्या वेळेत प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला.

तांत्रिक बिघाडामुळे मुंबईच्या दिशेने येणाऱ्या लोकल सेवा प्रभावित झाल्या. कुर्ला स्थानकापासून पुढे लोकल गाड्यांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. अनेक गाड्या विविध स्थानकांदरम्यान थांबून राहिल्याने प्रवाशांचा खोळंबा झाला. वाहतुकीवरील परिणाम कमी करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने कुर्ला स्थानकावरून काही लोकल गाड्या जलद मार्गावर वळवल्या. त्यामुळे मुख्य मार्गावरील वाहतूक शक्य तितकी सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

## सिद्धिविनायक सुशोभीकरणाला ५०० कोटी १४० मराठी कुटुंबांच्या पुनर्विकासाकडे दुर्लक्ष

■ मुंबई

दादरमधील श्री सिद्धिविनायक मंदिराच्या सुशोभीकरणासाठी ५०० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. मात्र मंदिरालगतच्या पुरुषोत्तम वाडीतील सुमारे १४० मराठी कुटुंबे गेली चार वर्षे पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत आहेत. घरांपासून वंचित झालेल्या शेकडो रहिवाशांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असून, पुनर्विकासाच्या प्रश्नाकडे प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला.

स्थानिकांनी सांगितले की, सिद्धिविनायक मंदिराच्या सुशोभीकरणासाठी शासनाकडून सुमारे ५०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. मात्र मंदिराच्या अगदी शेजारील पुरुषोत्तम वाडीतील बेघर झालेल्या मराठी कुटुंबांच्या पुनर्वसनाकडे दुर्लक्ष होत आहे. या वाडीत सुमारे १४० कुटुंबांतील ६०० ते ६५० नागरिक गेल्या चार वर्षांपासून स्वतःच्या घरापासून वंचित आहेत. प्रशासनाने इमारतीला धोकादायक घोषित करून रिकामी केली. त्यानंतर पाणी आणि वीजपुरवठ्यासारख्या मूलभूत सुविधांबाबतही अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. मात्र त्यावेळी मदतीसाठी कोणी पुढे आले नाही. या प्रश्नाकडे शासन आणि

» पान ७ वर

## शिर्डीच्या साईबाबांना १५ लाखांचा हिरेजडित सुवर्ण ब्रोच अर्पण



■ शिर्डी

**शिर्डीच्या** साईदरबारात आज दिल्लीतील एका साईभक्ताने साईबाबांना रत्नजडित सुवर्ण ब्रोच अर्पण केला. सुमारे ८० ग्रॅम सोन्यापासून तयार करण्यात आलेल्या या ब्रोचवर मौल्यवान रत्ने आणि हिरे जडविण्यात आले असून, त्याची किंमत अंदाजे १५ लाख रुपये आहे. साईबाबांच्या काकड आरती, मध्यान्ह आरती तसेच इतर आरतींच्या वेळी करण्यात येणाऱ्या श्रृंगारात हा सुवर्ण ब्रोच वापरण्यात येणार आहे. या ब्रोचमुळे साईबाबांच्या अलंकारांमध्ये आणखी एक मौल्यवान दागिन्याची भर पडली आहे. विशेष म्हणजे, संबंधित भाविकाने साई संस्थानला ९ लाख रुपयांची रोख देणगीदेखील दिली आहे. त्यामुळे या देणगीची एकूण रक्कम सुमारे २४ लाख रुपये इतकी झाली आहे. एवढी मोठी देणगी देऊनही संबंधित भाविकाने आपली ओळख गुप्त ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

## एअर इंडिया कॉलनी इतिहासजमा! अखेरचे कुटुंब स्थलांतरित

■ मुंबई

**मुंबईच्या** पश्चिम उपनगरांतील सांताक्रूझ, कलिना येथील १८५ एकरवर पसरलेली एअर इंडिया कॉलनी आणि इंडियन एअरलाईन्स कॉलनी लवकरच इतिहासजमा होणार आहे. गेल्या काही आठवड्यांपासून या ठिकाणच्या दीडशे रहिवाशांपैकी उरले-सुरले रहिवाशी सदनिका रिकाम्या करून अन्यत्र स्थलांतर करत आहेत. लवकरच येथील अखेरचे कुटुंब स्थलांतर करणार आहे.

मुंबई विमानतळाचे खासगीकरण झाल्यानंतर ही मालमत्ता मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेड (एमआयएएल) या कंपनीच्या ताब्यात गेली आहे. सुमारे वीस वर्षांपूर्वी हा भूखंड भाडेतत्वावर एअर इंडियाला देण्यात आला होता. त्यावर एअर इंडियाच्या वसाहती उभ्या राहिल्या होत्या. येथील १०६ इमारतींमध्ये



१ हजार ६८३ सदनिका असलेल्या चार वसाहती सरकारी मालकीच्या एआय असेट होल्डिंग्ज लिमिटेड या कंपनीकडून एमआयएएलकडे हस्तांतरित करण्यात आल्या आहेत.

२०२२ मध्ये एअर इंडियाच्या खासगीकरणानंतर ४ वर्षे कर्मचाऱ्यांनी सेवानिवृत्तीपर्यंत आपल्या निवासस्थानात राहण्याच्या हक्कासाठी लढा दिला. कामगार न्यायालयापासून हा लढा मुंबई उच्च न्यायालय आणि नंतर सर्वोच्च न्यायालयात पोहोचला. सर्वोच्च न्यायालयाने जागा रिकामी करण्यासाठी ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंतची मुदत तिली. त्यानंतर एमआयएएलने रहिवाशांच्या मुलांच्या शिक्षणात व्यत्यय येऊ नये म्हणून त्यांना शैक्षणिक वर्षाच्या अखेरपर्यंत येथे राहण्याची परवानगी दिली. त्यामुळे जागा सोडण्याची तारीख ३१ मेपर्यंत वाढवण्यात आली होती. ही मुदत आज संपत आहे.

## वन नेशन, वन इलेक्शन दोन टप्प्यांत लागू करणार?

■ नवी दिल्ली

**'एक राष्ट्र,** एक निवडणूक' या संकल्पनेची अंमलबजावणी दोन टप्प्यांत करण्याचा विचार सरकार करत आहे. संयुक्त संसदीय समिती (जेपीसी) समोर हा प्रस्ताव मांडण्यात आला असून, २०२९ व २०३४ अशा टप्प्यांत निवडणूक घेण्याचा पर्याय सर्वाधिक व्यवहार्य मानला जात आहे. त्यामुळे 'एक राष्ट्र, एक निवडणूक' राबवण्यासाठी केंद्र सरकार सुरक्षित मार्ग शोधत आहे, असे म्हटले जात आहे.

माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन समितीने यासंदर्भात अभ्यास करून आपला अहवाल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना सादर केला आहे. दोन टप्प्यांत निवडणूक घेण्याचा हा प्रस्ताव आहे. पहिल्या टप्प्यात २०२९ च्या लोकसभा निवडणुकांसोबत २० राज्यांच्या विधानसभा निवडणुका घेण्याची शक्यता आहे. तर २०३४ पर्यंत संपूर्ण देशात एकसमान निवडणूक चक्र लागू करण्याचे उद्दिष्ट आहे. या प्रक्रियेसाठी काही राज्यांमध्ये विधानसभांचा कार्यकाळ कमी किंवा वाढवण्याचे घटनात्मक पर्याय उपलब्ध असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. २०१८ मध्ये मध्य प्रदेश, राजस्थान, कर्नाटक, त्रिपुरा, तेलंगणा, मेघालय, नागालँड, मिझोराम यांच्या निवडणुका आहेत. त्यांच्या कालावधीत ५ महिन्यांपासून १ वर्षांपर्यंत वाढू शकतो. आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, ओडिशा, सिक्कीम, हरयाणा, झारखंड, महाराष्ट्र विधानसभांची मुदत २०२९ मध्ये संपणार आहे. यात कोणताही बदल करण्याची गरज भासणार नाही. तर २०३०-३१ मध्ये बिहार, दिल्ली, तामीळनाडू, पश्चिम बंगाल आसाम, पुद्दुचरी केरळची निवडणूक आहे. या विधानसभांचा कार्यकाल १ ते २ वर्षांनी कमी केला जाऊ शकतो. मात्र, यासाठी संसदेत कायदा आणि राजकीय सहमती आवश्यक ठरणार आहे.



**'जय'चे आकर्षण**

**भायखळ्यातील वीर जिजामाता उद्यान आणि प्राणी संग्रहालयात पर्यटक मोठ्या संख्येने हजेरी लावत आहेत. या संग्रहालयातील 'जय' या वाघाला पाहताना पर्यटकांनी आपल्या मोबाईलमधून त्याचे फोटो टिपले.**

## फुटबॉल सामन्यानंतर पॅरिसमध्ये हिंसाचार! शेकडो जणांना अटक

■ पॅरिस

**चॅम्पियन्स** लीगच्या अंतिम सामन्यात पॅरिस सेंट-जर्मेन (पीएसजी) संघाने ऐतिहासिक विजय मिळवल्यानंतर फ्रान्सची राजधानी पॅरिससह देशातील अनेक शहरांमध्ये जल्लोषाला हिंसक वळण लागले. हजारो चाहते रस्त्यावर उतरून आनंद साजरा करत असताना काही ठिकाणी तोडफोड, दगडफेक आणि पोलिसांशी झटापट झाल्याने गोंधळ निर्माण झाला.

फ्रान्सच्या गृह मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, देशभरात ४१६ जणांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यापैकी २८३ जण पॅरिसमधील आहेत. या घटनांमध्ये सात पोलीस अधिकारी जखमी झाले आहेत. तसेच सहा वाहनांचे, एका बेकरी आणि रेस्टॉरंटचे नुकसान झाले आहे. पॅरिसमधील प्रसिद्ध चॅम्प्स-एलिसी रस्त्यावर सुमारे २० हजार चाहते जमले होते. काही ठिकाणी चाहत्यांनी फटाके आणि फ्लेअर्स पेटवले, तर काहींनी रस्त्यावर अडथळे उभे करण्याचा प्रयत्न केला.

## राऊत-देशमुखांना तुरुंगात पाठवणाऱ्या ईडीच्या सत्यव्रत कुमारांची स्वेच्छानिवृत्ती

■ नवी दिल्ली

**अंमलबजावणी** संचालनालयातील (ईडी) विशेष संचालक सत्यव्रत कुमार यांनी तब्बल ११ वर्षांची सेवा शिल्लक असतानाही स्वेच्छानिवृत्ती घेतल्याने राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. मुंबईत कार्यरत असताना त्यांनी अनेक हायप्रोफाईल प्रकरणांचा तपास हाताळला होता, ज्यात नीरव मोदी-मेहुल चोक्सी यांचा पीएनबी घोटाळा, विजय मल्ल्या प्रकरण तसेच शरद पवार गटाचे नेते माजी गृहमंत्री अनिल देशमुख आणि उबाठा खासदार संजय राऊत यांच्याशी संबंधित कारवाईचा समावेश आहे. २००४ च्या बॅचचे भारतीय महसूल सेवा (सीमा शुल्क व अप्रत्यक्ष कर) अधिकारी असलेले कुमार २०१३ मध्ये ईडीमध्ये सहसंचालक म्हणून रुजू झाले होते. मुंबई युनिटचे प्रमुख असताना त्यांनी अनेक महत्त्वाच्या आर्थिक गैरव्यवहार आणि मनी लाँड्रिंग प्रकरणांचा तपास केला. २०२२ मध्ये त्यांना २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र नंतर २०२५ मध्ये त्यांची बदली कोलकाता येथे करण्यात आली होती. त्यांच्या कार्यकाळात नीरव मोदी-मेहुल चोक्सी यांच्याशी संबंधित सुमारे १२,५०० कोटी रुपयांचा पीएनबी घोटाळा, विजय मल्ल्या यांचा ९,२०० कोटी रुपयांचा कर्ज घोटाळा, तसेच येस बँक-डीएचएफएल व्यवहार आणि महादेव ऑनलाईन सट्टेबाजी प्रकरण यांसारख्या

## विधान परिषद निवडणुकीसाठी भाजपाचे ११ उमेदवार जाहीर

■ मुंबई


**राज्यातील** विधान परिषदेच्या १६ जागांवर निवडणुका होणार आहेत. या निवडणुकीसाठी भाजपाने ११ उमेदवारांच्या नावांची यादी जाहीर केली. भाजपाने पत्रक काढत उमेदवारांच्या नावांची यादी जाहीर केली.

शरद पवार गट सोडून भाजपामध्ये प्रवेश केलेले प्राजक्त तनपुरे यांना अवघ्या काही दिवसांतच अहिल्यानगराची उमेदवारी दिली. सोलापुरातून राजेंद्र राऊत, छत्रपती संभाजीनगर-जालन्यातून सुहास शिरसाट, नांदेडमधून अमर राजूरकर, धाराशिव-लातूर-बीडमधून बसवराज पाटील,

### प्राजक्त तनपुरे यांना अहिल्यानगरातून तिकीट

भंडारा-गोंदिया येथून अविनाश ब्राह्मणकर, अमरावतीतून प्रविण पोटे-पाटील, सांगली-सातारा येथून धैर्यशील कदम, जळगावातून नंदकिशोर महाजन, नागपुरातून डॉ. राजीव पोतदार, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोलीतून अरुण लखानी हे भाजपाकडून निवडणूक लढवणार आहेत.

## केदारनाथ यात्रा तात्पुरती स्थगित उत्तराखंडमध्ये अतिवृष्टीचा इशारा



■ डेहराडून

**उत्तराखंडमध्ये** सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर आणि हवामान विभागाने जारी केलेल्या ऑरेंज अलर्टमुळे प्रशासनाने केदारनाथ यात्रा तात्पुरती स्थगित केली आहे. यात्रेकरूंच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत हा निर्णय घेण्यात आला आहे.

हवामान विभागाने रुद्रप्रयाग जिल्ह्यात मुसळधार पाऊस, मेघगर्जना, वेगवान वारे आणि प्रतिकूल हवामानाचा इशारा दिला आहे. पुढील काही तासांत हवामान अधिक बिघडण्याची शक्यता व्यक्त करण्यात आल्याने प्रशासन सतर्क झाले आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी नंदन सिंह राजवार यांनी सांगितले की, ऑरेंज अलर्ट आणि खराब हवामान लक्षात घेऊन केदारनाथ यात्रा तात्पुरती थांबविण्यात आली आहे.

केदारनाथ धामकडे जाणाऱ्या भाविकांना विविध टप्प्यांवर आणि निश्चित करण्यात आलेल्या निवारा केंद्रांमध्ये थांबवून ठेवण्यात आले आहे. रुद्रप्रयाग जिल्ह्यातील डोंगराळ भागांमध्ये सतत पाऊस सुरू असून, संभाव्य भूस्खलन आणि अन्य नैसर्गिक आपत्तींचा धोका लक्षात घेऊन प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली आहे. पायी प्रवास करणाऱ्या यात्रेकरूंनाही जवळच्या सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले आहे. श्रीनगर परिसरातून केदारनाथकडे जाणाऱ्या वाहनांची वाहतूकही तात्पुरती बंद करण्यात आली आहे. हवामानात सुधारणा झाल्यानंतर परिस्थितीचा आढावा घेऊन यात्रा पुन्हा सुरू करण्याबाबत निर्णय घेतला जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.